# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०३ मार्च, २०२० / फाल्गुन १३, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(४) ग्रामविकास मंत्री**<br>**(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री**<br>**(६) महिला व बालविकास मंत्री**<br>**(७) मृद व जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७९**

---

### नदीजोड प्रकल्पांतर्गत मराठवाड्याला पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * ११२९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा-पिंजाळ हा आंतरराज्यीय सिंचन प्रकल्प तसेच नार-पार-गोदावरी हे राज्यांतर्गत नदीजोड प्रकल्प हाती घेताना २५.६० अब्ज घनफुट पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय तत्कालीन मंत्रिमंडळाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करार करताना नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यात पाणी देण्याची रचना करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठवाड्याला २५.६० अब्ज घनफुट पाणी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/(७५/२०१९)/जसंअ, दिनांक १९/०९/२०१९ अन्वये गोदावरी खोऱ्यातील दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी व गिरणा उपखोऱ्यासाठी कोकणामधून पाणी वळविणेसाठीच्या योजनांना तत्वत: मान्यता दिलेली आहे.

(२) होय.

दमणगंगा-वैतरणा गोदावरी (कडवा देवनदी) नदीजोड प्रकल्पाचा सर्वेक्षण अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सामंजस्य करार दिनांक १९/०६/२०१९ रोजी राष्ट्रीय जलविकास अभिकरण व जलसंपदा विभाग यांच्यामध्ये करण्यात आला. सदर करारामध्ये पुर्व संभाव्यता अहवालानुसार (PFR) सिन्नर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील क्षेत्र सिंचनाखाली आणणे प्रस्तावित आहे.

(३) पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणेसाठी एकात्मिक राज्य जल आराखड्यात अंतर्भूत असलेल्या योजनांचा प्राथमिक अभ्यास करणेसाठी शासन निर्णय, दिनांक १७/०९/२०१९ अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणेत आली आहे. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ३१/१०/२०१९ रोजी शासनास सादर केला आहे. त्यानुसार गोदावरी खोऱ्यातील मराठवाडा प्रदेशात कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास नदी खोऱ्यातून एकूण ८९.८५ अघफू पाणी वळविणेबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. उपरोक्त पैकी २.४३ अघफू पाणी वळणाच्या पूर्ण/बांधकामाधीन योजना आहेत. २५.५५ पाणी अघफू वळणाबाबत पार-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड व दमणगंगा-पिंजाळ पूर्ण झाल्यावर उर्ध्व वैतरणा ते गोदावरी नदीजोड योजनांचे प्रकल्प/पूर्व व्यवहार्यता अहवाल तयार

करण्यात आले आहेत. उर्वरीत ६१.८८ अघफू पाणी वळणाबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

उपरोक्त प्रकल्प / पूर्व व्यवहार्यता अहवाल तयार असलेल्या २५.५५ अघफू पाणी वळण योजनांपैकी, पार-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी योजनांच्या पूर्व व्यवहार्यता अहवालानुसार गोदावरी खोऱ्यातील नाशिक, अहमदनगरसह मराठवाड्यातील क्षेत्र सिंचनाखाली आणणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(२) * ९ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.अंबादास दानवे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.अनिल भोसले, श्री.विलास पोतनीस, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ४७३६८ ला दिनांक १ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात अनुक्रमे रुपये १५००/-, रुपये १२००/- व रुपये ७५०/- एवढया रकमेची वाढ जाहीर केली असून या मानधन वाढीबाबत रुपये २५३ कोटी शासनाकडे थकित असल्याचे

तसेच माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१९ या दोन महिन्यांचे वेतन अदा करण्यात आले नसल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पालघर जिल्ह्यातील ५,५८६ अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे दोन महिन्यांचे मानधन आणि मागील दहा महिन्यांचे वाढीव मानधन थकीत असल्याची बाब वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना व मुंबई, ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांबाबत मा.महिला व बालविकास मंत्री, मा.महिला व बालविकास राज्यमंत्री, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, अध्यक्षा, राज्य महिला आयोग यांच्याकडे दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ वा त्यासुमारास 'समर्थन' संस्थेने लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मानधन वाढ मिळण्याबाबत तसेच पेंशन व इतर प्रलंबित मागण्याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी परभणी जिल्ह्यासह मराठवाडा भागातील व राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये जेलभरो आंदोलन केले होते तसेच दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी देशव्यापी बंद करण्याचा इशारा दिला असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविका व इतर संबंधित कर्मचारी यांच्या असंतोषाची दखल घेऊन सदर कर्मचाऱ्यांना थकित वेतन, वाढीव मानधन अदा करण्यासंदर्भात व त्यांच्या अन्य प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१), (२), (३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालय यांचेकडून उपलब्ध अनुदानातून अमरावती, नागपूर व कोकण विभागातील अंगणवाडी कार्यकर्त्यांचे माहे नोव्हेंबर, २०१९ चे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीद्वारे दिनांक ०१/०१/२०२० रोजी अदा करण्यात आले आहे.

मानधन बाबीवरील पुरेशा अनुदानाअभावी उर्वरित पुणे, नाशिक व औरंगाबाद विभागातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर, २०१९ या महिन्याचे मानधन तसेच सर्व विभागातील माहे डिसेंबर, २०१९ या महिन्याचे मानधन प्रलंबित होते. परंतु, सद्य:स्थितीत सर्व विभागातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१९ व माहे जानेवारी, २०२० चे नियमित मानधन अदा करण्यात आलेले आहे.

केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मानधन वाढीनुसार राज्यात अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ पासून वाढ करण्यास शासन निर्णय, दिनांक १६ ऑगस्ट, २०१९ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार माहे ऑगस्ट, २०१९ पासून वाढीव मानधन अदा करण्यात आले आहे. तत्पुर्वीचा वाढीव मानधनाचा फरक माहे मार्च, २०२० च्या पहिल्या आठवड्यापर्यंत अदा करण्याची कार्यवाही एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालय यांचेस्तरावरुन करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात पॅलिएटिव्ह केअर सेंटर सुरु करण्याबाबत

**(३) * १९८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने कर्करोग, एच.आय.व्ही. बाधित तसेच इतर दुर्धर आजार झालेल्या रुग्णांच्या वेदना कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष उपचार (पॅलिएटिव्ह सेंटर) केंद्राची उभारणी करण्याची सन २०१२ मध्ये योजना आखली असताना राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून या योजनेद्वारे पॅलिएटिव्ह केअर सेंटर उभारण्याचे काम संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ७ वर्षाच्या काळात केवळ ८ जिल्ह्यात पॅलिएटिव्ह केअर सेंटर सुरु करण्याची प्रक्रिया संथगतीने सुरु असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात १९ जिल्ह्यात ही योजना सुरु करण्याचे नियोजन असताना सन २०१४-२०१५ पर्यंत अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, सातारा व नंदुरबार या सहा जिल्ह्यात तसेच सन २०१८-२०१९ मध्ये केवळ वर्धा आणि वाशिम या दोन जिल्ह्यात ही केंद्र सुरु करण्यास फक्त मंजुरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याच्या उर्वरित जिल्ह्यात पॅलिएटिव्ह केअर सेंटर सुरु करण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पॅलिएटिव्ह केअर सेंटर सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रम अंतर्गत दिनांक १५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रम टप्याटप्याने राबविण्यात येत असून सद्य:स्थितीत राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम कार्यान्वित आहे.

(४) केंद्र शासनाच्या मंजूरीच्या अधीन राहून पुढील पाच वर्षात टप्याटप्याने राज्याचे उर्वरित सर्व जिल्हे समाविष्ट करण्याचे नियोजन केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) * ३६३ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेच्या १७० वर्गखोल्या धोकादायक असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरचनात्मक लेखापरीक्षणानुसार १७० वर्गखोल्या धोकादायक तर ६२५ वर्गखोल्या पडक्या स्वरुपात असून भिवापूर व कुही तालुक्यात अशा धोकादायक शाळांची संख्या अधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुपये २७ कोटी खनिज प्रतिष्ठान तर रुपये १७ कोटींची तरतूद जिल्हा नियोजन समितीमधून करण्याचे ठरले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वर्गखोल्यांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे. ६२५ वर्गखोल्या दुरुस्तीयोग्य आहेत. तसेच, भिवापूर व कुही तालुक्यात अनुक्रमे २४ व २१ अशा एकूण ४५ वर्गखोल्या धोकादायक आहेत.
(३) होय, हे अंशत: खरे आहे. खनिज प्रतिष्ठान मधुन रुपये ५.२७ कोटीच्या मंजूर कामाचे नियोजन आहे.
(४) शाळातील धोकादायक वर्गखोल्यांची दुरुस्ती व बांधकामाचे नियोजन करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) * ८९१ श्री.रविंद्र फाटक, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात वर्ग-१ मधील डॉक्टरांची १९ पैकी १३ पदे रिक्त असून रुग्णालयात डॉक्टरांची संख्या सहाच असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात परिसेविकांची १४ पदे, लिपिक आणि तांत्रिक वर्गाची २१ पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्हा सामान्य रुग्णालयात रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय ठाणे येथे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर २० : ५६१००-१७७५००) मधील १९ पदे व (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर २३ : ६७७००-२०८७००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३३ पदे अशी एकूण ५२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३९ पदे भरलेली आहेत.

तसेच आयपीएचएस अंतर्गत १३ विशेषज्ञाच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

कार्यरत वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांमार्फत रुग्ण सेवा पुरविण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, ठाणे येथील परिसेविकांची एकूण २५ पदे मंजूर असून त्यापैकी २२ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. तसेच लिपिक व तांत्रिक संवर्गातील एकूण ८९ पदे मंजूर असून त्यापैकी ६८ पदे भरलेली आहेत व २१ पदे रिक्त आहेत. जिल्हा रुग्णालय ठाणे येथील गट-क संवर्गातील एकूण ३१५ मंजूर पदापैकी २६४ पदे भरलेली आहेत.

(३) राज्यात विशेषज्ञ संवर्गात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नाहीत. तसेच लिपिक वर्गीय पदभरतीवर शासन निर्बंध असल्याने ही पदे रिक्त आहेत.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर २३ : ६७७००-२०८७००) मधील विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच गट-क संवर्गातील पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे यांचेस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील वस्तू व सेवाकर विभागात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत

**(६) * १७५ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वस्तू व सेवाकर विभागात कार्यरत असलेल्या ७०० कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत दिनांक २१ व २४ जून, २०१९ रोजी आझाद मैदान येथे मूक धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत महाराष्ट्र राज्य कंत्राटी कर्मचारी संघटना, मुंबई तसेच लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना वस्तु व सेवाकर विभागामध्ये कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय.

(२) होय.

(३) वस्तू व सेवाकर विभागामध्ये कंत्राटी लिपिक नियुक्त केले जात नाहीत तर, बाहययंत्रणेद्वारे लिपिकाच्या सेवा घेण्यासाठी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येते. सदर कंत्राटदार हे

बाहययंत्रणेद्वारे कर्मचाऱ्यांची सेवा पुरवित असतात. सदर कर्मचारी हे कंत्राटदाराच्या आस्थापनेवर कार्यरत असून त्यांची नेमणूक कंत्राटदाराकडून विभागाच्या कार्यालयामध्ये करण्यात येते. त्यांची नियुक्ती करणे, त्यांना वेतन देणे तसेच त्यांची सेवा खंडीत करणे या बाबी कंत्राटदाराच्या स्तरावरुन केल्या जातात. त्यामुळे वस्तू व सेवाकर विभागामध्ये बाहययंत्रणेद्वारे सेवा घेतलेल्या लिपिकांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याची कार्यवाही अपेक्षित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना पूर्ववत लागू करण्याबाबत

**(७) * ५११ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोंव्हेबर, २००५ पासून नवीन परिभाषित अंशदान सेवानिवृत्तीवेतन योजना (डी.सी.पी.एस.) रद्द करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ (जुनी पेंशन) व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ पूर्ववत लागू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबताचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथे जिल्हा सामान्य रूग्णालयामध्ये रुग्णांना सोयी सुविधा पुरविण्याबाबत

**(८) * ८९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) येथे जिल्हा सामान्य रूग्णालयामध्ये प्राथमिक उपचारासाठी येणाऱ्या अपघातग्रस्त रुग्णांना अपुऱ्या सोयी सुविधा, स्वच्छतेचा अभाव तसेच आधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्याने उपचारापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालयातील अपघात विभागामध्ये उपलब्ध असलेल्या जागेत दोन कॉट उपलब्ध असून तेथे स्वच्छतागृहे नसल्यामुळे रुग्णांचे, काम करणाऱ्या डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालयात अपघात विभागासाठी असलेली जागा वर्षभरात तीन वेळा बदलण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा रूग्णालयात अपघातासह प्राथमिक उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळण्याच्यादृष्टीने तसेच रूग्णालयातील दुरवस्था दुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे २०० खाटांच्या निकषानुसार यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. उपचारार्थ आलेला कोणताही रुग्ण रुग्णसेवेपासून वंचित राहिलेला नाही.

(२) अपघात कक्षात स्वच्छतागृह नसल्याने रुग्णांचे काम करणाऱ्या डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आहे, हे म्हणने खरे नाही. रुग्णालयात स्वच्छतागृह उपलब्ध आहे.

(३) हे खरे आहे.

अपघात विभाग पूर्वी ज्या ठिकाणी कार्यान्वित होता. त्या विभागाचे नुतनीकरणाचे कामकाज चालू होते, म्हणून सदरचा कक्ष लगतच्या ट्रामा केअर युनिटच्या कक्षामध्ये तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित केलेला होता. डायलिसीस विभागामध्ये यापुर्वी ४ डायलिसीस मशीन कार्यान्वित होत्या तद्नंतर ७ डायलिसीस मशीन उपलब्ध झाल्याने जागे अभावी सदर कक्षामध्ये मशीन कार्यान्वित करणे शक्य नव्हते. डायलिसीस समोरील ट्रामाकेअर युनिटच्या कक्षामध्ये पुरेशी जागा असल्यामुळे डायलिसीस विभाग स्थलांतरीत करण्यात आलेला आहे. पूर्वीच्या डायलिसीस विभागाच्या कक्षात फेरफार व दुरुस्ती करुन तेथे अपघात कक्ष रुग्णसेवेसाठी कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जैतापूर प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(९) * ६४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापूर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) प्राथमिक आरोग्य केंद्र व त्याअखत्यारितील ६ उपकेंद्रात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे त्या परिसरातील ग्रामीण जनतेस औषधोपचारापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जैतापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असतानाही तेथे एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून दुसरा वैद्यकीय अधिकारी रुजू झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात आरोग्य सहाय्यिका आणि औषध निर्माण अधिकारी (फार्मासीस्ट) ही महत्वाची पदे रिक्त असून डोंगर जानशी, जानशी पडवे आदी केंद्रातील कर्मचाऱ्याच्या जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व रिक्त पदे विनाविलंब भरून गरीब रुग्णांना चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, जैतापूर व त्या अंतर्गत ५ उपकेंद्रातील एकूण २४ पदांपैकी ७ पदे रिक्त आहेत. कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देवून, आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

(२) जैतापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात २ वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत. त्यापैकी १ वैद्यकिय अधिकारी कार्यरत असून दुसरे वैद्यकिय अधिकारी सध्या प्रसुती रजेवर आहेत.

(३) होय.

तथापि, रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे.

(४) व (५) सद्य:स्थितीत मेगा पदभरती २०१९ अंतर्गत सर्व जिल्हा परिषदेकडील गट क संवर्गातील रिक्त पदांची पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## पुणे येथील ससुन रूग्णालयातील हृदयरोग शास्त्र विभागामधील पदे भरण्याबाबत तसेच आयसीयू विभाग सुरु करण्याबाबत

**(१०) * १०६५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील बी.जे.मेडीकल अंतर्गत असलेल्या ससुन रूग्णालयातील हृदयरोग शास्त्र विभागामध्ये वाढत्या शहरीकरणामुळे रूग्णांची संख्या वाढल्याने तेथील सहयोगी प्राध्यापकांच्या पदासह हृदयरोग तज्ञांची अनेक पदे रिक्त असून आयसीयू विभाग २४ तास कार्यरत नसल्याने अनेक रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.जे.मेडीकल अंतर्गत असलेल्या ससुन रूग्णालयामधील हृदयरोग शास्त्र या विभागामध्ये असलेली रिक्त पदे भरण्याबाबत व सहयोगी प्राध्यापक यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव बी.जे.मेडीकलच्या औषध वैद्यक शास्त्र विभागाकडून शासनाला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागाकडून बी.जे.मेडीकल अंतर्गत असलेल्या ससुन रूग्णालयामधील हृदयरोग शास्त्र या विभागाकडून सादर करण्यात आलेल्या उक्त प्रस्तावावर तसेच आयसीयू विभाग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) यासंदर्भात शासनास अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात डॉक्टर उपस्थित राहत नसल्याबाबत

**(११) * १२१६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे जिल्हा व जिल्ह्याबाहेरील रुग्ण मोठ्या प्रमाणात उपचाराकरीता येत असून या रुग्णालयातील डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी यांची पदे योग्य प्रमाणात भरलेली असूनही रुग्णांच्या विविध प्रकारच्या तपासण्या, औषधे, रक्त, शस्त्रक्रिया व इतर उपचाराकरीता त्यांना या रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी खाजगी रुग्णालयात जाण्याचा सल्ला देतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डॉक्टर अंबाजोगाई व इतर शहरातील त्यांच्या खाजगी रुग्णालयामुळे उक्त रुग्णालयातील सेवेवर उपस्थित न रहाण्यासाठी संगनमताने वरिष्ठांना त्यांच्या पगारातील ५०% रक्कम देऊन आर्थिक गैरव्यवहार करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने डॉक्टर व इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कसबा (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथील पाथ्रडदेवी-वडगांव रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१२) * ११०४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबा (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथील पाथ्रडदेवी-वडगांव रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम एक वर्षापासून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून करण्यात येत असून पूर्ण झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामात सिमेंट, पाण्याचा वापर न करता मातीमिश्रीत मुरुम व गिट्टी याचा वापर करण्यात आला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून सावळा, सावंगी, वडगांव येथील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन अन्य कंत्राटदाराकडे सदर रस्त्याचे काम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) सदर कामाबाबत गावकऱ्यांचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे. तथापि, सदर काम निकृष्ट दर्जाचे आहे हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर कामाची २ SQM यांनी गुणवत्ता तपासणी केली असून त्यांनी कामास समाधानकारक शेरा दिलेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कर्करोगाच्या रुग्णांना सुविधा मिळण्याबाबत

**(१३) * ५२४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या तीन वर्षात कर्करोगाचे रुग्ण व मृत्यू यामध्ये अनुक्रमे ११ हजार ३०६ व ५ हजार ७२७ इतकी वाढ झाल्याचे तसेच संपूर्ण देशाच्या तुलनेत एकटया महाराष्ट्रात ९ टक्के इतके कॅन्सरचे रुग्ण आढळले असल्याचे नॅशनल सेंटर फॉर डिसीज इन्फॉर्मेटिक्स ॲण्ड रिसर्च नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री प्रोग्रॅम यांनी सादर केलेल्या आकडेवारीवरुन माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्करोगाच्या रुग्णांच्या प्रमाणात ११ लाख ५७ हजार इतकी वाढ झाली असून उपचारासाठी शहरात येणाऱ्या रुग्णांचा वाया जाणारा वेळ, खर्च व त्यांची होत असलेली गैरसोय कमी करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात केमोथेरपी उपचार सुरू करण्याची घोषणा मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सध्या ११ जिल्ह्यांमध्ये उपलब्ध असलेल्या केमोथेरपी या सुविधेचा लाभ काही जिल्ह्यांना होत नसून ज्या जिल्ह्यात केमोथेरपी सुविधेचा लाभ रुग्णांना होत नाही त्याठिकाणी शासन सुविधा उपलब्ध करून देणार आहे काय,

(४) असल्यास, रत्नागिरी येथे केमोथेरपी केंद्रास मान्यता मिळूनही ते कार्यरत झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) राज्यात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या अधिक असून डॉक्टरांची संख्या कमी असल्याने रुग्णांची गैरसोय होत असून तीन हजार रुग्णांमागे एक तज्ञ डॉक्टर असल्याची माहिती क्षेत्रातील (होप ऑफ लाईफ) तज्ञांनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यात कर्करोग निदानासाठी रुग्णालय, तज्ञ डॉक्टरांची संख्या, इतर कर्मचारी व शस्त्रक्रिया करण्यासाठी सर्जनची संख्या वाढविण्याबाबत तसेच इतर जिल्ह्यांमध्ये केमोथेरपी केंद्र सुरू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) नॅशनल सेंटर फॉर डिसीज इन्फॉर्मेटिक्स यांनी प्रसिध्द केलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात सन २०१९ मध्ये कर्करोगाचे ११३०६ रुग्ण आढळले व ५७२७ मृत्यू झाले आहेत.

(२) व (३) हे खरे आहे.

देशामध्ये ११ लाख ५७ हजार रुग्ण आढळले असून राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी ११ जिल्हा रुग्णालयामध्ये केमोथेरपीची सुविधा उपलब्ध आहे. उर्वरित जिल्ह्यांमधील रुग्णांना महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नोंदणीकृत खाजगी रुग्णालयात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात केमोथेरपी केंद्र कार्यान्वित असून सन २०१९-२०२० मध्ये माहे जानेवारी, २०२० पर्यंत ४५ रुग्णांना केमोथेरपीची सुविधा देण्यात आली आहे.

(५) राज्यात कर्करोगी रुग्णांच्या तुलनेत तज्ञ डॉक्टरांची संख्या कमी आहे हे खरे आहे. परंतु होप फॉर लाईफ फाऊंडेशन यांनी महाराष्ट्र राज्यात असंसर्गजन्य आजाराबाबत अभ्यास केलेला आहे, असे आढळून आलेले नाही.

(६) राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात राज्य असंसर्गजन्यरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये जिल्हा रुग्णालय येथे कॅन्सर डे केअर सेंटर (किमोथेरपी युनिट) स्थापन करण्यात आले आहेत.

सदर जिल्ह्यामधील फिजीशियन व स्टाफ नर्स यांना टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे एक महिन्याचे किमोथेरपीबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. आतापर्यंत राज्यातील १६ जिल्ह्यामधील जिल्हा रुग्णालय येथील फिजीशियन व स्टाफ नर्स यांना किमोथेरपी प्रशिक्षण टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे देण्यात आले. उर्वरित २० जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय येथील फिजीशियन व स्टाफ नर्स यांना सन २०२०-२०२१ पर्यंत प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे व इतर जिल्ह्यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाच्या उपलब्धतेनुसार किमोथेरपी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यामध्ये सर्पदंश झालेल्या रुग्णाला वेळेवर उपचार मिळण्याबाबत

**(१४) * ६१६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयात सर्पदंशावर उपचारासाठी औषधांसह सर्व सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या असल्या तरी रुग्णांना मात्र वेळेत उपचार मिळत नसल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना मांत्रिकांचा आधार घ्यावा लागत असल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात मागील दिड वर्षात १२३६ जणांना सर्पदंश झाला असून त्यापैकी १५ रुग्णांचा मृत्यू झाला असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्पदंश झालेल्या रुग्णाला वेळेवर उपचार मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, रायगड येथे सर्पदंशावरील औषधांसह सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच ग्रामीण भागातील रुग्णांना मांत्रिकांचा आधार घ्यावा लागत असल्याची कोणतीही तक्रार जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांचेकडे प्राप्त झालेली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये मागील दिड वर्षात ३८९० सर्पदंशाच्या रुग्णांवर उपचार केले त्यापैकी ९ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे.

(३) राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये एकूण २०२१५७ सर्पदंश लसींचा साठा उपलब्ध आहे. रायगड जिल्ह्यात ६११० लससाठा शिल्लक आहे.

तसेच आपत्कालिन रुग्णवाहिकांमार्फत नजिकच्या आरोग्य संस्थेतून सर्पदंश लसी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयात अनेक उपकरणांची कमतरता असल्याबाबत

**(१५) * ७९६ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयात अनेक उपकरणांची कमतरता असल्यामुळे सुमारे ११ कोटी रूपयांची उपकरणे शासनाकडून पुरविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जास्त किंमतीची उपकरणे पुरविण्यात आली असूनही गरीब व गरजू रुग्णांना औषध मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे मागणी करूनही कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

गोंदिया संस्थेस सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षापासून विविध माध्यमातून यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी रुपये १३,८१,००,३८७/- ची यंत्रसामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वस्तू व सेवाकर (जीएसटी) परताव्याची रक्कम केंद्र शासनाकडून मिळण्याबाबत

**(१६) * ३०८ श्री.विलास पोतनीस, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाला रुपये १५ हजार ५५८ कोटी ५ लाख एवढी रक्कम केंद्र शासनाकडून मिळणारा राज्याचा हिस्सा, आपत्ती व्यवस्थापनाने केलेली मागणी आणि जीएसटीची क्षतीपूर्ती इत्यादी कर परताव्याच्या स्वरुपात येणे बाकी असून त्यापैकी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये रुपये ४४०६ कोटी थकबाकी राज्य शासनास मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन राज्य शासनाने माहे जुलै, २०१९ मध्ये आलेल्या पुरामुळे झालेल्या नुकसानीबाबत दिनांक १५ ऑक्टोबर, २०१९ रोजी रुपये ७२८८.०५ कोटी नुकसान भरपाई तसेच माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये आलेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा रुपये ७२०७.७९ कोटी देण्याचा प्रस्ताव दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९ रोजी केंद्र शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून राज्य शासनास जीएसटी कर परताव्याची रक्कम मिळण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत तसेच, उर्वरित रक्कम वेळीच राज्य शासनास मिळावी यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले व त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री.अजित पवार :** (१) अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०१९ पर्यंत केंद्र शासनाकडून अपेक्षित असलेला राज्याचा हिस्सा सुमारे रुपये ६९४६.२९ कोटी व माहे नोव्हेंबर, २०१९ पर्यंत अपेक्षित असलेली वस्तू व सेवाकर नुकसान भरपाई रुपये ८६११.७६ कोटी असे एकूण रुपये १५५५८.०५ कोटी येणे बाकी होते. केंद्र शासनाकडून वरीलप्रमाणे येणे बाकी असलेल्या रुपये १५५५८.०५ कोटी रकमेमध्ये आपत्ती व्यवस्थापनाने केलेली मागणीचा समावेश नाही. केंद्र शासनाकडे नोव्हेंबर, २०१९ पर्यंत प्रलंबित असलेली वस्तू व सेवा कर नुकसान भरपाई रुपये ८६११.७६ कोटीपैकी दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी राज्य शासनास रुपये ४४०६ कोटी इतकी वस्तू व सेवा कर नुकसान भरपाई मिळालेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वस्तू व सेवा कर (राज्यांना द्यावयाची नुकसान भरपाई) कायदा २०१७ च्या कलम ७ मध्ये, वस्तू व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणीमुळे राज्यांना होणाऱ्या नुकसानीची भरपाई (Compensation) देण्याची तरतूद आहे. त्यानुसार दर दोन महिन्यांनी केंद्र शासन राज्याना नुकसान भरपाईची रक्कम अदा करत असते. वस्तू व सेवा कर (राज्यांना द्यावयाची नुकसान भरपाई) कायदा २०१७ च्या कलम ८ मध्ये सदर नुकसान भरपाईची प्रतिपूर्ती करण्यासाठी काही वस्तूवर उपकर (Cess) आकारण्यात येतो. उपकराद्वारे (Cess) गोळा झालेला महसूल, वस्तू व सेवा कर Compensation Fund मध्ये जमा होतो. सदर वस्तू व सेवा कर Compensation Fund मधून केंद्र शासन राज्यांना वस्तू व सेवाकराची नुकसान भरपाई देत असते. या आर्थिक वर्षात आर्थिक मंदीमुळे बहुतेक सर्व राज्यांचे, राज्य वस्तू व सेवाकराचे (SGST) कर संकलन कमी झाल्यामुळे वस्तू व सेवाकराची नुकसान भरपाईच्या रक्कमेची मागणी वाढली आहे. तसेच, काही वस्तूवर आकारण्यात येत असलेल्या उपकराचे (Cess) कर संकलन सुध्दा कमी झाले आहे.

त्यामुळे केंद्र शासनाकडून राज्य शासनास वस्तू व सेवाकराची नुकसान भरपाई मिळण्यास विलंब होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने दिनांक १०/१२/२०१९ रोजी मा.केंद्रीय अर्थमंत्री महोदयांना वस्तू व सेवा कराची नुकसान भरपाई तसेच केंद्राकडून राज्यांना मिळणारा कराचा हिस्सा लवकरात लवकर देण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यात आयुष्यमान भारत योजनेतील जाचक अटीमुळे लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(१७) * ९९९ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७००८ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आयुष्यमान भारत राष्ट्रीय स्वस्थ विमा योजना राबविण्यात येत असून केंद्राचा ६० टक्के निधी व राज्याचा ४० टक्के निधीचा गरीब व गरजु रुग्णांना लाभ मिळावा यासाठी गेल्या ६ महिन्यापासून उक्त योजना खाजगी इंन्शुरन्स कंपनीमार्फत कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुष्यमान भारत ही योजना राज्यात कार्यान्वित करतांना योजनेतील जाचक अटीमुळे लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही योजना कार्यान्वित झाल्यापासून आतापर्यंत किती गरीब व गरजु रुग्णांना या योजनेचा लाभ मिळाला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून एकत्रितपणे विमा व हमी तत्वावर राज्यातील अंगीकृत शासकीय व खाजगी रुग्णालयामध्ये राबविण्यात येत आहे. योजना केंद्र शासनाच्या नॅशनल इन्शुरन्स कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेमध्ये सामाजिक, आर्थिक व जात जनगणना २०११ मधील ८३.७२ लक्ष कुटुंबे महाराष्ट्रातील लाभार्थी आहेत.

(२) हे खरे नाही.

योजनेंतर्गत पात्र लाभार्थींना १३०० उपचारासाठी ५ लाख रुपयांपर्यंत लाभ अंगीकृत रुग्णालयामधून नि:शुल्क देण्यात येत आहे.

(३) दिनांक २३/०९/२०१८ पासून ९,३४,७०६ लाभार्थ्यांनी एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेतला असून त्यापैकी १४५२६ लाभार्थींना केवळ प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेतला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालमृत्यू, मातामृत्यू, अर्भक मुत्यू व उपजत मृत्यू रोखण्याबाबत

**(१८) * ५०७ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.प्रविण दरेकर, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून प्रजनन व बाल आरोग्य मोहिमेंतर्गत दरवर्षी रुपये २ हजार ७०० कोटींचा निधी मिळूनही राज्यातील बालमृत्यू, मातामृत्यू, अर्भक मुत्यू व उपजत मृत्यूचे सरासरी प्रमाण २२ ते २८ हजारापर्यंत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सन २०१४ ते २०१९ यादरम्यान सुदृढ बालक व निरोगी माता यांच्यासाठी विविध योजनांद्वारे रुपये ३,२३८ कोटी खर्च केलेले असतानाही या कालावधीत सुमारे १,०९,६८३ बालकांचा, तर ६,५११ गरोदर मातांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, केरळ, कर्नाटकच्या तुलनेत महाराष्ट्रात अर्भक मृत्यूचा दर सर्वाधिक असून राज्यात ११,७०० अर्भक मृत्यू, १०,००० बालमृत्यू व उपजत मृत्यू आणि १,८०० माता मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ ते दिनांक १५ जानेवारी २०२० या कालावधीत निदर्शनास आले असून गेल्या वर्षभरात १८४६५ बालमृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुलांचे कुपोषण थांबावे, गर्भवतींना पोषक आहार मिळावा, त्यांची निकोप वाढ व्हावी, मातांची प्रकृती उत्तम रहावी यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून मिळालेला निधी उपाययोजनांपेक्षा त्यांच्या प्रचार प्रसिध्दीवर अधिक खर्च केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील बालमृत्यू, मातामृत्यू, अर्भक मृत्यू व उपजत मृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमासाठी दरवर्षी सरासरी ६०० ते ६५० कोटी एवढा निधी मंजूर होतो.

एच.एम.आय.एस.च्या अहवालानुसार सन २०१९-२०२० (डिसेंबर, २०१९ अखेर) मधील मृत्यूचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. :-

| वर्ष | बाल मृत्यू | अर्भक मृत्यू | उपजत मृत्यू | माता मृत्यू |
|---|---|---|---|---|
| २०१९-२०२० (डिसें. २०१९ अखेर) | १९५० | १२१४७ | १२२२२ | १०७० |

(२) हे अंशतः खरे आहे.

एचएमआयएस च्या अहवालानुसार सन २०१४ ते २०१९ या दरम्यान एकूण १०८५७६ बालकांचा व ६४८५ मातांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

(३) हे खरे नाही.

एसआरएस २०१७ च्या अहवालानुसार अर्भक मृत्यूदर पुढीलप्रमाणे आहे.

| राज्य | अर्भक मृत्यूदर प्रमाण |
|---|---|
| केरळ | १० |
| महाराष्ट्र | १९ |
| कर्नाटक | २५ |

देशामध्ये अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करण्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा तिसरा क्रमांक लागतो.

(४) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार माता व बाल आरोग्य संबधी उपाययोजना व प्रचार प्रसिध्दी या दोन्ही बाबीवर मंजूर अनुदानाप्रमाणे खर्च केला जातो.

(५) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील उपाययोजना राबविण्यात येतात -

१) घरच्या घरी नवजात बालकांची काळजी (Home Based New Born Care), आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी आरोग्य संस्थांमध्ये विशेष कक्ष (Special New Born Care Unit-(SNCU), नवजात शिशु कोपरा (New Born Care Corners-(NBCC), बाल उपचार केंद्र (Child Treatment Centres-CTC) स्थापन केले आहे.

२) माता मृत्यू टाळण्यासाठी गरोदरपणाची नोंदणी (१२ आठवड्याच्या आत), किमान ४ वेळा विविध तपासण्या, विशेष जोखमीच्या मातांचा तज्ञांमार्फत तपासणी करुन औषधोपचार करण्यात येतो.

राज्यातील सर्व गरोदर मातांच्या प्रसूतीच्या दिनांकाच्या एक महिना अगोदरपासून संस्थात्मक प्रसूती होण्यासाठी आरोग्य यंत्रणेमार्फत पाठपुरावा करणे, १६ आदिवासी जिल्हयात नवसंजीवनी योजनेंतर्गत तेथील जनतेला औषधोपचाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महिला व बालविकास विभागामार्फत शालेय पोषण आहाराचे कंत्राट नियमबाहय पध्दतीने दिल्याबाबत

**(१९) * २७३ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५०३ ला दिनांक १७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांमार्फत लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार पुरविण्यासाठी रुपये ६३०० कोटी खर्चाची कंत्राटे देण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला असून त्यानुसार दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी नियमांकडे दुर्लक्ष करीत महिला व बालविकास विभागाने कंत्राटे दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुपये ६३०० कोटी खर्चाची देण्यात आलेली कंत्राटे/निविदा नियमबाहय व बेकायदेशीर असल्याच्या कारणामुळे ती रद्द करण्याचा आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्यामध्ये ६ महिने ते ३ वर्षाची बालके व गरोदर स्तनदा माता यांना Take Home Ration (THR) देण्यासाठी दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी निविदा प्रकाशित करण्यात आली होती. सदर निविदेसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल झाली होती. सदर SLP मध्ये दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने अंतिम आदेश पारित केले होते. सदर अंतिम आदेशानुसार १८ निविदाधारकांना THR पुरवठ्याचे काम मंजूर केले होते. सदर निविदा पूर्णपणे केंद्र शासनाच्या गाईडलाईन्स व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या यापुर्वीच्या आदेशांच्या अधिन राहून काढण्यात आली होती. महिला व बालविकास विभागाने ६३०० कोटी रुपयाचे कंत्राट दिलेले नाही.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ च्या आदेशाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

अ) THR पुरवठ्यासाठी दिनांक ८/०३/२०१६ ची निविदा रद्द करण्यात यावी.

ब) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १९/०४/२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार देण्यात आलेले १८ संस्थांचे काम थांबविण्यात यावे.

क) १८ संस्थांचा पुरवठा बंद करुन १० दिवसाच्या आत THR पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

ड) नविन निविदा काढताना पंचायत किंवा ग्रुप ऑफ पंचायत हे युनिट धरुन निविदा काढण्यात याव्यात.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रादेशिक रुग्णालय येरवडा, पुणे येथील कंत्राटदारांकडून कंत्राटी कामगारांचा सीपीएफ (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी) त्यांच्या खात्यावर जमा न केल्याबाबत

**(२०) * ८५३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक रुग्णालय येरवडा, पुणे येथील कंत्राटदारांकडून कंत्राटी कामगारांचा सन २०१० ते २०१४ या कालावधीतील सीपीएफ (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी) त्यांच्या खात्यावर जमा केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अटी व शर्तीची पुर्तता न करता रुग्णालयाच्या अधीक्षक व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून लाखोंची देयके अदा करण्यात आल्याची बाब लेखापरिक्षणात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन कंत्राटी कामगारांचा सीपीएफ (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी) त्यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी ३ अधिकाऱ्यांविरुध्द दिनांक १७/०२/२०२० रोजीच्या स्वतंत्र ज्ञापनाद्वारे दोषारोप निश्चित केले आहेत. तसेच एका अधिकाऱ्याच्या विभागीय चौकशी प्रकरणी, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती दिनांक २०/०२/२०२० रोजीच्या स्वतंत्र आदेशान्वये केली आहे. तसेच कंत्राटी कामगारांच्या सीपीएफची रक्कम रूपये ६१,०३,९६२/- भविष्य निधी संघटन कार्यालयाकडे जमा झालेली आहे व संबंधित कामगारांच्या खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या अपुरी असल्याबाबत

**(२१) * २८० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात रहात असून तेथे प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या अपूरी असल्यामुळे नागरिकांना उपचारासाठी गुजरात राज्यातील वापी किंवा सिल्वासाला जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या वाढविण्याबाबत तसेच या भागात जिल्हा रुग्णालय वा ग्रामीण रुग्णालय मंजूर करुन, सदर रुग्णालयात डॉक्टर व परिचारिकांची पदे निर्माण करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासनाने मंजूर केलेल्या बृहत आराखड्यानुसार जिल्ह्यात सद्य:स्थितीत ५५ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर आहेत. त्यापैकी ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत व उर्वरीत ९ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ३ ठिकाणी जागा प्राप्त झाली असून त्यांच्या बांधकामाची कार्यवाही सुरु आहे व ६ ठिकाणी जागेअभावी त्यांचे बांधकाम सुरु करता आलेले नाही. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्रा व्यतिरिक्त जिल्ह्यात १७ प्राथमिक आरोग्य पथके, ४ आयुर्वेदीक दवाखाने, ५ ॲलोपॅथीक दवाखाने व ३ फिरती आरोग्य पथके वैद्यकीय अधिकाऱ्यासह कार्यरत आहेत व रुग्णांना सेवा पुरवित आहेत.
(२) पालघर जिल्ह्यामध्ये १०० खाटांची दोन उपजिल्हा रुग्णालये, ५० खाटांचे एक उपजिल्हा रुग्णालय व ३० खाटांची ९ ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत. या सर्व आरोग्य संस्थामार्फत उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. जव्हार येथील २०० खाटांचे रुग्णालय बांधकामाच्या अंदाजपत्रकास दिनांक २०/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय वाणगांवचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. ग्रामीण रुग्णालय, खानिवडे व ग्रामीण रुग्णालय, बोईसर यांचे बांधकामासाठी लागणारी जागा जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांच्या नावे करण्याची कार्यवाही सुरु आहे. सन २०१३ च्या बृहत आराखड्यात नव्याने मंजूर १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, वसई-नवघर व ५० खाटांचे श्रेणीवर्धनास मान्यता असलेले ग्रामीण रुग्णालय, मोखाडा व ग्रामीण रुग्णालय, विक्रमगड यांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयामध्ये ट्रामाकेअर युनिट कार्यान्वित करण्याबाबत

**(२२) * ३७० श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६७५५ ला दिनांक २५ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयामध्ये ट्रामाकेअर युनिट कार्यान्वित करण्याबाबतचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य विभाग, अकोला मंडळ, अकोला यांनी जा.क्र.नियोजन/ग्रा.रु.आर्णी/ट्रॉकेयु/२०१५, दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ नुसार संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार संचालक आरोग्य सेवा यांनी जा.क्र. सं.आ.से/कक्ष-३/टे-५ संकींण/ट्रॉकेयुबाबत/ग्रा.रु.आर्णीबाबतचा प्रस्ताव दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यातील ट्रामा केअर सेंटरची व्यवहारार्यता तपासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे ट्रामाकेअर सेंटरचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी निकष तयार करुन शासनास शिफारस करण्यासाठी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये तांत्रिक समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी समितीने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) राज्यातील ट्रामाकेअर युनिटची व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल दिनांक १३/११/२०१९ रोजी शासनास प्राप्त झाला असून समितीच्या अहवालावर आयुक्त, आरोग्य सेवा यांचे दिनांक ०८/०१/२०२० रोजीच्या

पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले आहेत. आयुक्त, आरोग्य सेवा यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर ट्रामाकेअर युनिटबाबतचे धोरण निश्चित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ६७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७०९३ ला दिनांक १ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानातील बहुतांश कामे अर्धवट स्थितीत राहिली असून झालेल्या कामांपैकी अनेक कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याने त्या कामांची व तपासणी करणाऱ्या अधिकारी व त्रयस्थ यंत्रणेची चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २०१८-२०१९ मध्ये जिल्हयातील नागरिकांनी जलयुक्त शिवार अभियानातील विविध कामांबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडेही लेखी निवेदनाव्दारे तक्रारी नोंदविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील दोन्ही प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मौजे कारेगाव, शहापूर व साडेगाव येथील सिमेंट नाला बंधाऱ्यांची तपासणी करण्यासाठी

त्रयस्थ तपास यंत्रणा, वाप्कोस यांना आदेशित करण्यात आले होते. त्यानूसार संस्थेने कारेगाव व शहापूर येथील सिमेंट नाला बंधाऱ्यांची पाहणी व चौकशी केली असून चौकशीत बंधाऱ्यांची कामे निकृष्ट पध्दतीने केली असल्याचे आढळून आले आहे. त्यानुषंगाने सदर कामे करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराविरूध्द नवा मोंढा पोलीस स्टेशन, परभणी येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

साडेगाव येथील सिमेंट बंधाऱ्यांच्या कामांसदर्भात संबंधित शाखा अभियंता यांचेवर पोलीस स्टेशन, कदिम जालना येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच तत्कालिन उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, परभणी यांचेविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणच्या विकासाकरीता महामंडळाची स्थापना करण्याबाबत

**(२४) * १०२३ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रामध्ये समाजातील उपेक्षित घटकांच्या कल्याणाचा विचार करुन शासनाने सुरु केलेल्या विविध महामंडळांपैकी कॅगने दिलेल्या अहवालानुसार तोट्यातील महामंडळे शासन बंद करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जी महामंडळे तोट्यात आहेत अशी महामंडळे बंद करुन त्या भागात गरजु समाज घटकांसाठी नविन महामंडळे स्थापन करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीचा अंदाज घेता महाराष्ट्रातील कोकण विकासाकरीता एकही महामंडळ नसल्यामुळे सदर महामंडळाची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषदांमध्ये एकात्मिक बालविकास प्रकल्प विकास योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या मुख्यसेविकांच्या पदोन्नतीबाबत

**(२५) * ९६३ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदांमध्ये एकात्मिक बालविकास प्रकल्प योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या मुख्यसेविका (आंगणवाडी पर्यवेक्षिका) या पदाला पदोन्नतीच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत,
(२) तसेच, या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी नसेल तर त्याबाबत शासनाने धोरण अवलंबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ जानेवारी, २०१४ अन्वये जिल्हा परिषदेमधील आठ संवर्गांना महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये पदोन्नती देण्यात येते. यामध्ये जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३), समाजकल्याण संवर्गासाठी ०५ टक्के कोटा निश्चित केला आहे. या संवर्गात जिल्हा परिषदेमधील अंगणवाडी पर्यवेक्षिका एकात्मिक बालविकास सेवा योजना यांचा समावेश होतो. त्यानुसार अंगणवाडी पर्यवेक्षिकांना महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये पदोन्नतीच्या संधी उपलब्ध आहे
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निम्न तापी प्रकल्पाचे (ता.अमळनेर, जि.जळगाव) काम प्रलंबित असल्याबाबत

**(२६) * ८९९ श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ४८३४० ला दिनांक २४ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगाव) तालुक्यातील निम्न तापी (पाडळसरे धरण) प्रकल्पाची अंदाजित किंमत सन २०१७-२०१८ च्या दरसूचीनुसार अडीच हजार कोटीपर्यंत वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२०२० या वर्षात प्रकल्पासाठी रुपये ३२ कोटी ५० लक्ष निधीची तरतूद असताना त्यातील सुमारे रुपये २८ कोटी निधी खर्च झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपलब्ध निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पाला निधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

केंद्र शासनाच्या, केंद्रीय जल आयोगाने त्यांचे पत्र दिनांक ०४/०६/२०१८ अन्वये रुपये २७५१.०५ कोटी (दरसुची २०१६-२०१७) एवढी किंमत अंतिम केलेली आहे.

(२) होय.

(३) प्रकल्पाचे प्रस्तंभाच्या टूनियन तलांकामधील बदलामुळे संकल्पचित्रात आवश्यक बदल करण्याचे काम सुरू आहे.

(४) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना व बळीराजा जलसंजिवनी योजना यामध्ये समाविष्ट नसलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून रुपये १५००० कोटीचे दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास दिनांक ०९/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली असून त्यामध्ये निम्न तापी प्रकल्पाचा समावेश आहे.

(५) कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आगळंबे (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत निवडणुकीत गैरप्रकारे निवडणुक प्रक्रिया राबविल्याबाबत

**(२७) * ३३९ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगळंबे (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत निवडणुकीत वार्ड क्रमांक दोनमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी दोन पदे असताना प्रभागातील महिलाऐवजी दोन सर्वसाधारण गटातील उमेदवार निवडून आल्याचे घोषित करुन चुकीचा निकाल हवेली तहसिलदारांकडून देण्यात आल्याने वार्ड क्रमांक दोनमध्ये तहसिलदार, हवेली यांनी चुकीची निवडणूक प्रक्रिया राबविल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरप्रकारे निवडणुक प्रक्रिया राबविल्याने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) मौजे आगळंबे, ता.हवेली, जि.पुणे येथील ग्रामपंचायत निवडणुकीत वार्ड क्र. २ मध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी दोन पदे असताना प्रभागातील महिलाऐवजी सर्वसाधारण प्रवर्गातील दोन उमेदवार निवडून आल्याचे घोषित करुन चुकीचा निकाल तहसिलदार हवेली यांच्याकडून देण्यात आला ही बाब खरी नाही.

ग्रामपंचायत निवडणुकीचा निकाल घोषित करणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत.

(२) अ) तहसिलदार, हवेली व निवडणूक निर्णय अधिकारी, आगळंबे यांनी ग्रामपंचायत आगळंबे, ता.हवेली, जि.पुणे येथील चुकीचे निवडणुकीचे निकाल पाठविणेत असल्यामुळे तहसिलदार, हवेली व निवडणूक निर्णय अधिकारी, ग्रामपंचायत आंगळंबे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.

ब) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने मतपत्रिका तयार केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगास त्या एका वार्डासाठी पुन्हा नव्याने निवडणूकीचा कार्यक्रम घ्यावा लागला. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी श्री.वामन डबेटवार, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती हवेली यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत कळविण्यात आले आहे.

क) ग्रामपंचायत निवडणूक योग्यरितीने पार पाडणेची सर्वस्वी जबाबदारी तहसिलदार यांची असते, मौजे आगळंबे, ता.हवेली, जि.पुणे ग्रामपंचायतीच्या बाबतीत झालेली चुक ही गंभीर स्वरुपाची असल्यामुळे तहसिलदार, हवेली यांना यापुढे अशा प्रकारची चुक होणार नाही याची दक्षता घेणेबाबत सक्त ताकिद देणेत आलेली आहे.

(३) संबंधितांवर कारवाई करणेबाबत कळविणेत आलेले आहे.

-----------------

## शासकीय महाविद्यालय, अकोला येथे एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * १२६७ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय महाविद्यालय, अकोला (जि.अकोला) येथील एमआरआय मशीनसाठी धर्मदाय आयुक्त यांनी निधी देऊन सुद्धा एमआरआय मशीन खरेदी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक रुग्णालय प्रशासनाने गरज पडल्यास शासनाकडे अधिक निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रुग्णालयात एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अकोला संस्थेसाठी ३ टेस्ला एमआरआय खरेदीसाठी शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान करून रुपये ११.५२ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर यंत्रसामुग्रीच्या किंमतीत वाढ झाल्याचे निदर्शनास आल्याने अतिरिक्त निधीबाबत स्थानिक रुग्णालय, प्रशासनाने, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव प्रशासकीय विभागास प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) लागू नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील आजनसरा बॅरेज प्रकल्पाला मंजूरी मिळूनही कामाला सुरुवात न झाल्याबाबत

**(२९) * १८९ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजनसरा बॅरेज प्रकल्पाला (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) सन २००५-२००६ च्या दरसुचीनुसार प्रकल्पाला सुधारित मान्यता तसेच रूपये २०,४८२.२७ लक्ष देवूनही प्रकल्पाची कामे सुरु न झाल्यामुळे लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जून, २०१९ रोजी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले असूनही प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे हिंगणघाट तालुक्यातील ४८ गावातील २४,००० हेक्टरी शेती सिंचनापासून वंचित असून १२ गावातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याने सदर प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी पूर्ण करून शासनाने सुधारित मान्यता देवून कामांना सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) आजनसरा बॅरेज प्रकल्पाच्या कामाला शासनाने रुपये २०८४२.२७ लक्षास नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रकल्पाचे काम वन जमीन व पर्यावरण मान्यता प्राप्त न झाल्याने सुरू झालेले नाही. सदर कामाला सुरूवात करण्यासाठी पुढील कार्यवाही व्हावी अशी विनंती करणारे पत्र लोकप्रतिनिधीकडून प्राप्त झाले आहे.

(२) प्रकल्पास आवश्यक वन जमीन मान्यता, पर्यावरण मान्यता तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याकरीता संबंधित कार्यालयांकडे पाठपुरावा सुरु आहे. प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्र कमी करण्याबाबत अभ्यास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य महिला आयोगातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३०) * १५२९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष, सदस्य आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या न झाल्यामुळे आयोगाचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांचा कार्यकाळ संपला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष, सदस्य व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

(२) श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांची नियुक्ती दिनांक १८/०२/२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये करण्यात आली आहे. तथापि, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी त्यांच्या दिनांक

४/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास राजीनामा सादर केला आहे. सदर राजीनामा मंजूर करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे धामापूर (खालचावाडा) बौध्दवाडी-आंबेरी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(३१) * १६२२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०९८५ ला दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धामापूर (खालचावाडा) बौध्दवाडी-आंबेरी मार्गे चौके (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याची सन २०१८-२०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दुरवस्था झाली असून या रस्त्याचे डांबरीकरण करुन या मार्गाने एस.टी.वाहतूक सुरु करण्याबाबत ग्रामस्थांनी माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.ग्रामविकास मंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचेकडे निवेदनाद्‌वारे मागणी करुनही रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०१९ अखेर किती निधी उपलब्ध करुन दिला आहे व त्यापैकी किती निधी खर्च झाला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करुन एस.टी.वाहतूक सुरु करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी मार्गे चौके (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर ६.५०० कि.मी. लांबीचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे. तसेच ग्रामीण मार्ग क्र. ४०२ च्या सा.क्र. ०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरूस्तीचे काम विविध योजनांतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेला सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) सदर रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत शासनाने माहे डिसेंबर, २०१९ अखेर रुपये ४३०.३५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला असून त्यापैकी रुपये ३६३.७६ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे.

(३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत डांबरीकरण पूर्ण झालेल्या ६.५०कि.मी. लांबीच्या रस्त्यावरून सर्व प्रकारची बारमाही वाहतूक सुरू असून एस.टी.वाहतूक सुरु करण्यासाठी एस.टी.विभागाला आवश्यक तो दाखला दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद शाळांच्या विजेचे देयक ग्रामपंचायतीने भरण्याबाबत

**(३२) * १८७६ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद शाळांचे वीज देयक ग्रामपंचायतीने अदा करावे, असे स्पष्ट आदेश ग्रामविकास विभागाने दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमुळे अनेक शाळा डिजिटल स्कूल उपक्रमापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेसाठी वित्त आयोगातील २५ टक्के निधी खर्च करावा असे बंधनकारक असूनही त्यात शाळांचे वीज देयक ग्रामपंचायतींनी अदा करावे, तसेच देयक अदा केले नाही म्हणून वीज बंद राहत असल्याने त्याचा परिणाम ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ग्रामपंचायतीविरुध्द कारवाई करुन जिल्हा परिषद शाळांचे वीज देयक थकीत राहणार नाही यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) हे खरे नाही. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वीज देयक समग्र शिक्षा अभियानातून व ४% सादील अनुदानातून भरले जाते.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ट्रामाकेअर सेंटरची बांधकामे पूर्ण करण्याबाबत

**(३३) * २१०३ श्री.महादेव जानकर, श्री.सदाशिव खोत, श्री.नागोराव गाणार, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाकडे निधीची कमतरता असल्यामुळे जिल्हा व तालुका पातळीवरील ट्रामा केअर सेंटरची रुपये १ हजार २०० कोटींची बांधकामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, इस्लामपूर (ता.वाळवा, जि.सांगली) येथे ट्रामाकेअर सेंटरला मान्यता देवूनही बांधकाम पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व आरोग्य केंद्राचे ट्रामा रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण करुन चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदरचा निधी उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सध्या बांधकाम सुरु असलेल्या १९ ट्रामाकेअर युनिटसाठी सुमारे रुपये २०.७६ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(२) अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, इस्लामपूरचे श्रेणीवर्धन व ट्रामाकेअर सेंटरच्या इमारत बांधकामाच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) बांधकाम सुरु असलेल्या एकूण १०९ ट्रामाकेअर सेंटरचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी निधीच्या उपलब्धतेनुसार तरतूद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मेयो सुपर स्पेशालिटी रुग्णालय, नागपूर
## रूग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(३४) * २१२७ श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ४७५४९ ला दिनांक १ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या मेयो रूग्णालयात रुग्णांच्या आजाराचे अचूक निदान करण्यासाठी शासनाने सिटीस्कॅन, एमआरआय आणि डिजिटल एक्स-रेसाठी ३५ कोटींचा निधी दिला आहे परंतु हाफकिन्सच्या कार्यप्रणालीमुळे सदरहू मशीन्स मेयो रूग्णालयाला मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रूग्णालयात विदर्भासह मध्यप्रदेश व छत्तीसगढ येथील रूग्ण उपचारासाठी येत असून येथील अपुऱ्या सोयी-सुविधा आणि अद्ययावत उपचार तंत्राच्या अभावामुळे रूग्णांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेयोत २५० खाटांच्या क्षमतेचे नवे रूग्णालय सुरू झाले असून अपघात विभाग नव्याने कार्यान्वित झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मेयोकडे एमआरआय मशीन उपलब्ध नसल्यामुळे मस्तिष्काला अंतर्गत जखमा झालेल्या रुग्णाला बाहेरून जास्त पैसे देऊन एमआरआय काढून आणावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांची होत असलेली गैरसोय टाळण्यासाठी व यंत्र सामुग्री खरेदीसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) सदर संस्थेसाठी सीटी स्कॅन, एमआरआय, डिजीटल एक्स रे यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली असून सदर यंत्रसामुग्री रुग्णसेवेसाठी उपलब्ध झाली आहे.

-----------------

## राज्यात अंडवृध्दी व हत्तीरोग आजारावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(३५) * २१३३ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या हत्तीरोग रुग्ण शोधण्याच्या मोहिमेत अंडवृध्दी व हत्तीरोग आजार असलेल्या २० हजार रुग्णांची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात मराठवाडा व विदर्भातील आठ जिल्ह्यात अंडवृध्दीच्या रुग्णांची संख्या अधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंडवृध्दी व हत्तीरोग आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी तसेच रुग्णांवर उपचार करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे** : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक १ ते १४ डिसेंबर, २०१९ या कालावधीमध्ये राज्यात हत्तीरोग रुग्णशोध मोहिम घेण्यात आली. यामध्ये एकूण १६,४२९ अंडवृध्दी रुग्णांची नोंद झाली आहे. तसेच या मोहिमेमध्ये ३४०६४ बाहयलक्षणेयुक्त (हत्तीपाय) रुग्णांची नोंद झाली आहे.

(२) व (३) अंडवृध्दी रुग्णांच्या शस्त्रक्रिया करुन घेण्यासाठी राज्यस्तरावरुन मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. जिल्हा व तालुकास्तरावर शिबिरांचे आयोजन करुन जास्तीत जास्त अंडवृध्दी रुग्णांच्या शस्त्रक्रिया करुन घेण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

विदर्भ व मराठवाड्यातील उपरोक्त ८ जिल्हयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सर्जन व भूलतज्ञ यांची सेवा उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. तसेच खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचाही (सर्जन) शस्त्रक्रिया शिबिरांमध्ये सहभाग घेतला जात आहे.

- राज्यातील एकूण ५३४१ अंडवृध्दी शस्त्रक्रियांपैकी विदर्भ व मराठवाड्यातील ८ जिल्हयांमधील ४५५८ अंडवृध्दी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.
- हत्तीरोग रुग्णासाठी मॉर्बिडिटी क्लिनीकमध्ये पायाची काळजी घेण्याविषयी माहिती सांगण्यात येते. तसेच प्रात्यक्षिक करुन दाखविले जाते.
- सध्या राज्यात ८ जिल्हयांमध्ये सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबविण्यात येत आहे त्याची माहिती खालीलप्रमाणे

नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर व भंडारा येथे (आयव्हरमेक्टीन, डीईसी व अल्बेंडाझोल) या तीन औषधांचा वापर करुन सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबविण्यात येत आहे.

नांदेड, गोंदिया, ठाणे व पालघर येथे डीईसी व अल्बेंडाझोल या दोन औषधांचा वापर करुन सामुदायीक औषधोपचार मोहिम राबविण्यात येत आहे.

- डासोत्पत्ती स्थानांची गणना करुन डासोत्पत्ती स्थानावर अळीनाशकाची फवारणी करुन तसेच किरकोळ अभियांत्रिकी पध्दतीने डासोत्पत्ती स्थाने नष्ट करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांची पदे भरण्याबाबत

**(३६) * २३४२ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील ३ वर्षामध्ये रिक्त झालेल्या एकूण पदापैकी अंगणवाडी सेविका व मदतनीसांची ५ हजार ५०० पदे भरण्यास मान्यता देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालविकास विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर सदर भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय मा.मंत्री महोदयांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अंगणवाडी सेविका व मदतनीसांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत नंदुरबार, गडचिरोली, उस्मानाबाद, वाशिम हे निती आयोगाचे महत्वकांक्षी जिल्हे तसेच डावी-कडवी विचारसरणी यामधील गोंदिया, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील काही भाग तसेच संपूर्ण पालघर जिल्हा, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, धारणी आणि चिखलदरा या प्रकल्प / तालुक्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची रिक्त पदे भरण्यास शासन निर्णय, दिनांक ८/१०/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार या शासन निर्णयान्वये परवानगी दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त राज्यातील उर्वरित सर्व क्षेत्रातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या रिक्त पदांपैकी ५०% रिक्त पदे भरण्यास

शासन निर्णय, दिनांक १७/०१/२०२० अन्वये मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत सदरची पदे भरण्याबाबत जिल्हास्तर व प्रकल्पस्तरावर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व घाटी रुग्णालय, औरंगाबाद येथे एम.आर.आय. मशीन बंद असल्याबाबत

**(३७) * ७९८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व घाटी रुग्णालय, औरंगाबाद येथील एम.आर.आय. मशीन अनेक दिवसापासून बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एम.आर.आय. मशीन दुरुस्त करुन गरीब रुग्णांची होणारी गैरसोय दुर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद संस्थेसाठी नवीन ३ टेस्ला एमआरआय यंत्रसामुग्री बायबॅक पध्दतीने खरेदीचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सबब संस्थेतील आयुष्यमान संपुष्टात आलेली १.५ टेस्ला ही एमआरआय यंत्रसामुग्री नोव्हेंबर, २०१९ मध्ये पुरवठादारास परत करण्यात आलेली आहे. सदर संस्थेत नवीन ३ टेस्ला एमआरआय यंत्रसामुग्री प्रस्थापित करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(२) जुन्या एमआरआय यंत्रसामुग्रीचे आयुष्यमान संपुष्टात आलेले असल्याने नवीन एमआरआय यंत्रसामुग्री प्रस्थापित करण्यात येत आहे. दरम्यानच्या कालावधीत ज्या आर्थिक दुर्बल रुग्णांनी बाहेरून एमआरआय करून आणले आहेत. अशा रुग्णांना नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत निधीतून रुपये ११०० इतके शुल्क संस्थास्तरावरुन अदा करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी परिसराच्या विकास आराखड्याबाबत

**(३८) * १०८६ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील बंजारा समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या पोहरादेवी या परिसराच्या विकासासाठी शासनाने गेल्या वर्षी रुपये १२५ कोटी रकमेचा विकास आराखडा जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुपये १२५ कोटी रकमेपैकी रुपये ८ कोटीच शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित निधी देऊन पोहरादेवी परिसराचा विकास करावा अशी शासनाने मागणी बंजारा समाजाच्या सामाजिक संघटनांनी व तेथील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित अनुदान प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे आहे. तथापि, वाशिम जिल्ह्यातील संत सेवालाल तीर्थक्षेत्र, पोहरादेवी, तीर्थक्षेत्रास दिनांक २२/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २५.०० कोटी इतक्या निधीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये ५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, दिनांक ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ७५.०० कोटी इतक्या रकमेच्या आराखड्यास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी रुपये ६.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. अशाप्रकारे एकूण रुपये १००.०० कोटी इतक्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून रुपये ११.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, वाशिम यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) वाशिम जिल्ह्यातील संत सेवालाल तीर्थक्षेत्र, पोहरादेवी, तीर्थक्षेत्रास दिनांक २२/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २५.०० कोटी इतक्या निधीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये ५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, दिनांक ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ७५.०० कोटी इतक्या रक्कमेच्या आराखड्यास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. त्यापैकी रुपये ६.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. अशाप्रकारे एकूण रुपये १००.०० कोटी इतक्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून रुपये ११.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, वाशिम यांना वितरीत करण्यात आला आहे. तथापि, याप्रकरणी, जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडून वितरीत निधी रुपये ५.०० कोटीबाबत खर्चाचा सविस्तर अहवाल पाठविण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# राज्यात हिमोफेलीया रक्ताच्या आजारासाठी आवश्यक असलेल्या औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(३९) * ७५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हिमोफेलीया या रक्ताच्या आजाराचे ५७०० रुग्ण असून त्यांना अत्यावश्यक असलेल्या औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिमोफेलीया या आजाराच्या रुग्णांना रक्तात गुठळी निर्माण होत असल्यामुळे फॅक्टर नऊ, आठ, सात तसेच थिबा या औषधांच्या किंमती रुपये ३० ते ४० हजार असल्यामुळे बहुतेक रुग्णांना औषध घेणे परवडत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने यापूर्वीच हिमोफेलीयाच्या रुग्णांसाठी मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर, जळगाव, अमरावती, सातारा व नांदेड या ठिकाणी औषधोपचार केंद्रे सुरु केली असली तरीही राज्यातील बहुतेक केंद्रावर फॅक्टर सात व थिबा ही औषधे उपलब्ध होत नसल्याचे हिमोफेलीया सोसायटी ऑफ इंडियाचे सचिव श्री.अजय पालांडे यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर औषधे आरोग्य केंद्रावर सवलतीच्या दरात विनाविलंब मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे. आजारग्रस्तांची नैसर्गिकरित्या रक्त गोठण्याची क्रिया होत नाही. तसेच सदर औषधे रुग्णांना विनामुल्य दिली जातात. तसेच हिमोफेलीया सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेने निवेदन दिले हे खरे आहे. तथापि, आणिबाणी तत्वावर औषधे खरेदी करुन सर्व केद्रांना पुरविण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळेतील डिजीटल उपकरणे बंद असल्याबाबत

**(४०) * ३२७ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळेतील डिजीटल उपकरणे अनुदानात घट झाल्याने बंद असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानात घट झाल्याने जिल्हा परिषद शाळांची वीज जोडणी कापल्याने शाळेतील डिजीटल उपकरणे निकामी झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९७५ च्या शिक्षण विषयक तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या शाळेची वीज देयके ग्रामपंचायतीकडून भरली जावी अशी मागणी शासनाकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डिजीटल उपकरणे असलेल्या शाळांना तात्काळ विद्‌युत पुरवठा जोडणी होणेकरीता शासनाने अत्यावश्यक कार्यवाही प्रस्तावित केली असून केंद्र शासनाच्यांतर्गत समग्र शिक्षा अभियान विभागास उक्त समस्या सोडविण्याबाबत अथवा अनुदानात वाढ होण्यासाठी शासनाने शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९७५ नुसार संबंधित ग्रामपंचायतींनी शाळांची वीज देयके भरावी असे जिल्हा परिषद, नागपूर यांच्या पत्रान्वये आदेशित केले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(४१) * ९७५ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आवारात बायोमॅट्रिक कचरा उघड्यावर टाकला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या कचऱ्यामध्ये सॅनिटरी नॅपकिन, रुग्णांना दिलेली इंजेक्शनचे नीडल व औषधे असल्याने रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा प्राप्त झाला असतानाही या रुग्णालयात रुग्णांना उपचार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.
उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी या रुग्णालयाकडील जैविक कचरा पर्यावरण विभागाकडील ठेकेदारामार्फत दररोज नेला जातो.
(२) व (३) हे खरे नाही.

स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय येथे उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रमाणकानुसार व आय.पी.एच.एस.च्या मानांकानुसार रुग्णहितार्थ सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कोंडगांव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील काजळी नदीवरील पुलाच्या पुनर्बांधणीबाबत

**(४२) * ९३१ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्‌या चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोंडगांव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील काजळी नदीवरील कोंडगांव-पुर्ये-तर्फे देवळे पुलाची स्थिती अत्यंत धोकादायक झाली असून भविष्यात पुरस्थिती निर्माण झाल्यास पुल कोसळून मोठ्या प्रमाणात जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या पुनर्बांधणीबाबत लोकप्रतिनिधींनी विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून सभागृहात तसेच पत्रव्यवहारामार्फत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूलाची शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय तसेच पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पूलाची पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

सदर पुल सुस्थितीत नसल्याने सद्य:स्थितीत सदर पुलावरुन सर्व प्रकारची वाहतूक बंद करणेत आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर पुलाची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून सदर पुल नादुरुस्त आहे. त्याची रुंदी वाढविणे व पुनर्बांधणी करणेसाठी रुपये ६५८.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. जिल्हा परिषदेकडे रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता विविध योजनांमधून मर्यादित स्वरुपात निधी प्राप्त होत असून सदर निधीमधून एका पुलाच्या बांधकामासाठी एवढा निधी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. त्यामुळे जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उपलब्ध अनुदानामधून सदर काम प्रस्तावित करणेबाबत जिल्हा परिषदेने विनंती केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किसनपूर ग्रामपंचायत (ता.सडक अर्जुनी, जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला आवार भिंत बांधण्याबाबत

**(४३) * ५१४ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किसनपूर ग्रामपंचायत (ता.सडक अर्जुनी, जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या शाळेला आवार भिंत बांधकामाचा प्रस्ताव शाळेकडून जिल्हा परिषद शिक्षण विभागाला पाठवूनही सदर आवार भिंतीला मंजूरी मिळाली नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शाळेला आवार भिंत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, शाळा परिसरच्या सभोवताल बांबु व मेहंदीचे कुंपन करण्यात आले आहे. तथापि, सदर शाळेला संरक्षण भिंत बांधकामाचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविणे या शिर्षकाखाली प्रस्ताव सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे ग्रामीण व इतर रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) * ८७० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात माहे जुलै ते सप्टेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण व इतर रस्ते मोठ्या प्रमाणात नादुरूस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध होण्याबाबत रायगड जिल्हा परिषदेकडून शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण व इतर रस्ते दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधीचे वाटप रस्त्यांची लांबी व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी रायगड जिल्हा परिषदेस रुपये ४६६.३७ लक्ष व सन २०१८-२०१९ मध्ये रुपये ५०५.८८ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

-----------------

## कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात (ता.खेड, जि.रत्नागिरी) वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) * ९७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात (ता.खेड, जि.रत्नागिरी) सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे विविध अर्हताधारक, डॉ. विकास के. नारायण (भूलतंज्ञ), डॉ.प्रकाश कुंडलीक जांभुळकर (एम.डी.मेडिसीन) व डॉ. रामनाथ दिघे (डीपीवी-सीपीएस) या तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांना रत्नागिरी जिल्हा रुग्णालय येथे हजर करून घेतले असून मागील ४ महिन्यापासून त्यांचे वेतन व अन्य भत्ते कळंबणी उपजिल्हा रुग्णालयातून अदा करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कळंबणी उपजिल्हा रुग्णालय हे १०० खाटांचे अतिदक्षता विभाग व अन्य सुविधा उपलब्ध असलेले सुसज्ज रुग्णालय असून आवश्यक त्या तंत्र वैद्यकीय अधिकाऱ्यांअभावी येथे उपलब्ध साहित्यातून ग्रामस्थांना सेवा मिळत नसल्याने औषधोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची विनाविलंब सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

तीन वैदयकीय अधिकाऱ्यांपैकी दोनच वैदयकीय अधिकारी उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी येथे रुजू झाले आहेत.
(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत उपजिल्हा रुग्णालय कळंबणी खेड येथे नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांसह राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या विशेषतज्ञांमार्फत रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करुन दिली जात आहे व रुग्णसेवेमध्ये कोणतीही अडचण येऊ दिली जात नाही.
(४) जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी हे जिल्हयांचे रुग्णालय असून तेथील रिक्त पदे व आंतररुग्ण व बाहयरुग्ण तसेच अत्यवस्थ रुग्णांची संख्या जास्त असल्याने रुग्णहितास्तव दोन वैदयकीय अधिकारी यांना जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे काम पाहण्याकरीता आदेशित केलेले होते. तथापि, सद्य:स्थितीत दोन्ही अधिकाऱ्यांना उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी येथे काम करण्याबाबत आदेशित केलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नसल्याबाबत

**(४६) * २१६४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयात १ हजार २९ ग्रामपंचायती असून त्यापैकी १५२ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नसल्याने या ग्रामपंचायती खाजगी जागेत सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नसल्याने गावातील विकास कामे होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कार्यालय नसलेल्या ग्रामपंचायतीचा आढावा घेऊन या जिल्हयातील ग्रामपंचायतींना स्वत:ची जागा उपलब्ध करुन इमारत बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयातील १ हजार २९ ग्रामपंचायतींपैकी १५२ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नाही, परंतु सदर ग्रामपंचायतींचे कामकाज हे पर्यायी शासकीय इमारतीत चालू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयाची स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत मान्यता देऊन कामाच्या प्रगतीनुसार निधी उपलब्ध करून दिला जातो. सदर योजनेंतर्गत सोलापूर जिल्हयातील एकूण १२ ग्रामपंचायतींना शासनस्तरावरून मान्यता देण्यात आलेली आहे तसेच सदर योजनेसाठी निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित पात्र ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामासाठी मान्यता देऊन निधी वितरण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सवणे (जि.रायगड) येथील शेतकरी श्री.महेंद्र देशमुख यांनी न घेतलेल्या कर्जाबाबत

**(४७) * १०८७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सवणे (जि.रायगड) येथील शेतकरी श्री.महेंद्र देशमुख यांनी न घेतलेल्या कर्जाच्या बोजाप्रकरणी मा.मुख्यमंत्री यांच्या खाजगी निवासस्थानी भेटण्यास गेले असता तेथील पोलिसांनी त्यांना व त्यांच्या लहान मुलीला धक्के देवून बाहेर काढले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.महेंद्र देशमुख यांनी सन २००६ मध्ये बँक ऑफ इंडियाच्या आपटे शाखेतुन त्यांच्या मुदत ठेवमधून (फीक्स डिपॉझीट) वीटभट्टीसाठी २ लाख रुपयांचे कर्ज घेऊन त्याची परत फेडही केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.महेंद्र देशमुख यांनी २,८०,०००/- रुपये बँक ऑफ इंडिया या बँकेत मुदतठेव ठेवली असणे, परंतु, बँकेने परस्पर त्यांच्यावर ८ लाख रुपयांचे कर्ज आहे असे दाखवून ती मुदत ठेवची रक्कम वळती करुन त्यांच्या सवणे येथील घरावर बँकेने ८ लाख रुपयांचा बोजा चढवला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.महेंद्र देशमुख यांच्यावर बँक ऑफ इंडियाकडून न घेण्यात आलेल्या कर्जाबाबत चौकशी करुन बँकेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.महेंद्र देशमुख यांनी सन २००६ मध्ये बँक ऑफ इंडिया शाखा, आपटा, ता.पनवेल या बँकेतून दिनांक २३/०२/२००६ व दिनांक १२/०६/२००७ रोजी वीट भट्टी व्यवसायासाठी वर्कींग कॅपिटल म्हणजेच कॅश क्रेडिट अगेन्स्ट स्टॉक ऑफ अर्थ ब्रिक्स मटेरियल असे रक्कम अनुक्रमे रुपये १,५०,०००/- व रुपये ५०,०००/- असे एकूण रुपये २,००,०००/- कर्ज घेतले आहे. या कर्ज रकमेसाठी रुपये ४०,०००/- व रुपये २०,०००/- अशा मुदत ठेवी तारण ठेवल्या होत्या. तसेच त्यांनी सदर कर्जाची वेळोवेळी पूर्ण परतफेड केलेली नाही.

(३) श्री.महेंद्र देशमुख यांच्या नावे कर्जदार म्हणून व सौ.सरीता देशमुख यांच्या नावे जामीनदार म्हणून अनुक्रमे एकूण रक्कम रुपये १,३०,०००/- व रुपये १,५०,०००/- प्रमाणे अतिरिक्त मुदत ठेवी आहेत. कॅश क्रेडिट खाते वेळोवेळी थकीत होत असल्याने संबंधित ठेवी या बँकेच्या लेटर ऑफ सेट ऑफ ॲण्ड अप्रोप्रिएशननुसार दिनांक ३१/०५/२०१९ रोजी कर्ज रकमेपोटी वळती करुन घेतल्या आहेत. श्री.महेंद्र देशमुख यांच्या दिनांक १५/०३/२००८

च्या कर्ज अर्जानुसार त्यांचे कॅश क्रेडीट खात्याची कर्ज मर्यादा रुपये ८ लाख इतकी करण्यात आली. त्यासाठी त्यांचे राहते घर बँकेस गहाणखत दिले आहे. दिनांक ३१/०५/२०१९ पासून रुपये ८,१८,०६८.३४ व व्याज व इतर खर्च एकूण थकीत आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणात अपर जिल्हा दंडाधिकारी, रायगड यांच्या अखत्यारीत चौकशी केली असता श्री.महेंद्र देशमुख यांची तक्रार वस्तुस्थितीला धरुन नसल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात ग्रामीण भागात आरोग्य उपकेंद्राच्या स्थापनेसाठी लोकसंख्येच्या निकषाबाबत

**(४८) * १४०६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी लोकसंख्येचा निकष ५ हजार असून ग्रामीण भागातील लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे कोकणातील काही ठिकाणी आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्यासाठी अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहत आराखड्यानुसार रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या ग्रामीण भागात एकही आरोग्य उपकेंद्र स्थापन होऊ शकणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विरसई (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्याबाबत लोकसंख्येची अट रद्द करण्याची मागणी स्थानिक व कोकण पदवीधर लोकप्रतिनिधींनीकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण भागात आरोग्य उपकेंद्राच्या स्थापनेसाठी लोकसंख्येचा निकष १ हजारापर्यंत किंवा काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

बृहत आराखड्यात रत्नागिरी जिल्ह्यात ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २ उपकेंद्रे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १ उपकेंद्र नव्याने मंजूर केली आहेत.
(४) विरसई या गावाची लोकसंख्या ६८० असून, हे गाव डवली उपकेंद्र अंतर्गत येते व ते ५ कि.मी. अंतरावर आहे. विरसई जवळील ५ गावांची लोकसंख्या २३७१ आहे. त्यामुळे विरसई येथे नवीन उपकेंद्र लोकसंख्येच्या निकषात बसत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोवारीटोला (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरुस्ती करण्याबाबत

**(४९) * २०५३ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झालिया केंद्र ग्राम पोवारीटोला (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषदेच्या हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळेची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जुलै, २०१९ मध्ये केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांनी सदर दुरवस्थेत असलेल्या शाळेची पाहणी करुन शाळेच्या दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेला पाठवूनही शाळेच्या दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळेच्या वर्ग खोल्या दुरुस्ती व नवीन वर्ग खोल्या उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषदेकडे पत्रव्यवहार केला असून १४ व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शाळेची दुरुस्ती करण्याबाबत ग्रामपंचायतीला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोवारीटोला येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर शाळा दुरुस्तीचे प्रस्ताव समग्र शिक्षांतर्गत सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावित आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर शाळेतील वर्गखोल्या दुरुस्तीचे प्रस्ताव समग्र शिक्षा अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक २०२०-२०२१ या वर्षात प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंडियन मेडिकल कौन्सिलने आखून दिलेल्या नियमांचे मुंबईतील वाडीया रुग्णालयाने पालन न केल्याबाबत

**(५०) * १३३२ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुग्णालयातील खाटा, वैद्यकीय सेवा, डॉक्टर, कर्मचारी यांच्यासह खाजगी सेवा किती असावी याबाबत इंडियन मेडिकल कौन्सिलने आखून दिलेल्या सूत्रांचे मुंबईतील वाडीया रुग्णालयाने पालन न केल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन व महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या नियमांचेही पालन न करता व या दोन्ही शासकीय यंत्रणांना विश्वासात न घेताच अनेक नियमबाह्य निर्णय वाडीया ट्रस्टने घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाडीया ट्रस्टच्या नौरोसजी वाडीया व जेरबाई वाडीया या दोन्ही रुग्णालयांकडून सी.ई.ओ., अधिकारी/कर्मचारी वेतन, मानधन आणि निवृत्तीवेतन घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाडीया ट्रस्टवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

या रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्त रुग्णालयांकरीता असलेल्या आकृतिबंधचे व कर्मचारी संबंधात असलेल्या नियमांचे पालन केले जात नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

या रुग्णालयांचे स्वत:चे नियम असून त्यांच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेतल्या जाणाऱ्या निर्णयानुसार त्यांचे कामकाज चालते, असे रुग्णालयाचे म्हणणे आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

शासनाने व मुंबई महानगरपालिकेने संबंधित रुग्णालयांची तपासणी केली असता काही अधिकारी/कर्मचारी एका रुग्णालय ट्रस्टकडून वेतन व दुसऱ्या रुग्णालय ट्रस्टकडून मानधन तसेच दोन्ही ट्रस्टकडून निवृत्तीवेतन घेत असल्याचे दिसून आलेले आहे. शासनाचा अहवाल शासन निर्णय, दिनांक ०८ मार्च, २०१९ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीकडे पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मार्च, २०१८ या संपलेल्या वर्षात कॅगने घेतलेल्या आक्षेपांबाबत

**(५१) * १५६१ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४२८१९ ला दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक वर्ष संपलेल्या माहे मार्च, २०१८ मध्ये रुपये ६५ हजार कोटी रक्कमेची ३२५७० उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर न केल्याने विशिष्ट कारणांसाठी मंजूर केलेल्या अनुदानाच्या उपयोगितांवर विभागाचे नियंत्रण नसल्याचे स्पष्ट झाले असल्यामुळे कॅगने अनियमितता असल्याचा शेरा दिनांक ३१ मार्च, २०१८ या आर्थिक वर्षातील अहवालात दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनियमिततेबाबतच्या कॅगच्या अहवालातील शेऱ्यांबाबत आढावा घेण्यात आला आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) अंशत: खरे आहे, प्रशासकीय विभाग व स्वायत्त संस्था/वाणिज्य उपक्रम यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेवर सादर केली जात नसल्याची बाब कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आली आहे.

(२) व (३) शासकीय काम पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्रे काम करणाऱ्या संबंधित विभागांकडून महालेखापाल कार्यालयास सादर केली जातात.

प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास विहित कालावधीत सादर करण्याच्या व प्रलंबितता कमी करण्याच्या सूचना वित्त विभागामार्फत वेळोवेळी सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे सदर प्रमाणपत्रे विहित कालावधीत सादर न केल्यास संबंधितांविरूध्द करावयाच्या कार्यवाहीबाबत देखील प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रलंबितता कमी करण्यासाठी विभागांनी कालबध्द कार्यक्रम आखून कार्यवाही करण्याबाबत दिनांक १४/११/२०१९ च्या अर्धशासकीय पत्रान्वये याबाबत पुन्हा एकदा सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच माहे ऑक्टोबर, २०१९ ते माहे डिसेंबर, २०१९ या कालावधीत प्रादेशिक विभागीयस्तरावर महालेखापाल कार्यालयातील प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत लेखा व कोषागारे संचालनालयामार्फत सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकरीता कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत शौचालयाच्या निधीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(५२) * २०७४ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत उटावली (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील ग्रामपंचायतीत सन २०११ ते २०१६ मध्ये ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांनी शौचालयाच्या निधीमध्ये केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याचे आदेश तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर यांनी दिनांक २३ जानेवारी, २०१८ व दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शौचालयाच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करायचे आदेश दिले असतानाही कारवाई करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांना न्याय देण्याबाबतची मागणी समर्थन

संस्थेच्यावतीने मा.गृह मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास), जिल्हाधिकारी, पालघर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उटावली ग्रामपंचायतीत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) होय, ग्रामपंचायतीने पायाभूत सर्व्हेक्षणाव्यतिरिक्त वाढीव कुटूंबाना शौचालय बांधून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमिता केल्याचे दिसून येते.

सदरच्या अनियमितेस जबाबदार श्री.जी.एल. वारघडे, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच श्री.सतीश मधुकर गायकवाड, सरपंच ग्रामपंचायत उटावली यांच्याविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील नियम ३९(१) नुसार पदावरुन दूर करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २६/१२/२०१९ रोजी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे सादर करण्यात आला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ विकास महामंडळाने निधीची तरतूद करुनही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पूर्ण रकमेचे प्रस्ताव पाठविले नसल्याबाबत

**(५३) * ३७५ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील ११ जिल्ह्यांकरीता विदर्भ विकास महामंडळाने रुपये ५० कोटींची तरतूद केली असतानाही या ११ जिल्ह्यांपैकी काही जिल्हाधिकारी यांनी पूर्ण रकमेएवढे विकास प्रस्ताव पाठविले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुपये ५० कोटी तरतूदीपैकी आतापर्यंत जिल्ह्यांना किती निधीचे वाटप करण्यात आले आहे, उर्वरित निधीचे वाटप केव्हा करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.
(२) नियोजन विभाग, शासन निर्णय, दिनांक २३ जुलै, २०१९ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधी वितरीत करण्यात येतो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री आयुष्यमान भारत जन आरोग्य अंतर्गत गोल्डन कार्ड वितरीत करण्याबाबत

**(५४) * ६७४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री आयुष्यमान भारत जन आरोग्य अंतर्गत जिल्ह्यातील १ लक्ष ४७ हजार कुटुंबियांना गोल्डन कार्ड वितरीत करण्याबाबत जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद, परभणी यांच्यास्तरावरून देण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी सन २०१९-२०२० मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा सामान्य रूग्णालय, जिल्हा आरोग्य अधिकारी व इतर यंत्रणेकडून सदर योजना जिल्ह्यामध्ये राबविण्यात दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन ही योजना जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) परभणी जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १,४६,७१३ लाभार्थी कुटुंबे असून सर्वसाधारणपणे ६,८९,५५१ लाभार्थी आहेत. यापैकी १,३६,४७४ लाभार्थ्यांना ई-कार्ड प्राप्त झालेले आहे. परभणी जिल्ह्यात ३ अंगीकृत रुग्णालयातून तर ७५० आपले सरकार सेवा केंद्रातून ई-कार्ड वितरणाचे काम चालू आहे. ई-कार्ड वाटपाचे काम मोहिमेच्या स्वरुपात चालू आहे. अंगीकृत रुग्णालयाकडून ई-कार्डचे वाटप मोफत केले जाते तर आपले सरकार सेवा केंद्रामधून ई-कार्डसाठी रुपये ३० इतके शुल्क आकारले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोळपिंप्री (ता.पारोळा, जि.जळगाव) येथील बोरी नदीवरील बंधारे बांधकामाचा प्रस्तावाबाबत

**(५५) * ९०३ श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ४८२१९ ला दिनांक २४ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळपिंप्री (ता.पारोळा, जि.जळगाव) येथील बोरी नदीवरील बंधारे बांधकामाचा प्रस्ताव व अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे सादर करण्यात आले असून सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी यांच्यामार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधारे बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आले होते. तथापि, जलयुक्त शिवार अभियान समितीने निवडलेल्या गावातच सदर कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात आला. मात्र कोळपिंप्री या गावाचा जलयुक्त शिवार अंतर्गत निवड झालेल्या गावांच्या यादीत समावेश नसल्याने व निधी उपलब्धते अभावी सदर कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील राज्य कर सहआयुक्त व इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५६) * ३९९ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागांतर्गत नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा व गोंदिया या सहा जिल्ह्यातील राज्य कर सहआयुक्त (वस्तु व सेवा कर) तसेच राजपत्रित अधिकारी व कर्मचाऱ्यांची २६५ पदे रिक्त असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय.

(२) रिक्त असलेली सरळसेवेची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यासाठी मागणीपत्रे पाठविण्यात आली आहेत. तसेच उर्वरित पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य पुरातत्व विभागातील रिक्त पदे असल्याबाबत

**(५७) * १५३४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पुरातत्व विभागात ५० टक्क्यांहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गड किल्ल्याची जबाबदारी असलेल्या विभागातील मंजूर ३०० पदापैकी १२८ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढया मोठ्या प्रमाणात पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) हे खरे नाही.

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयातील मंजूर ३०० पदांपैकी १२७ पदे रिक्त आहेत.

(३) वित्त विभागाच्या दिनांक ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयान्वये रिक्त पदे भरण्याबाबत सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५० टक्के किंवा एकूण संवर्गाच्या ४ टक्के यापैकी जे कमी असेल ती भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच वित्त विभागाच्या दिनांक १४/०१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये गट ड मधील २५ टक्के पदे निरसीत करण्याचे निर्देश आहेत.

(४) रिक्त असलेल्या १२७ पदांपैकी या विभागाच्या दिनांक २०/०६/२०१९ च्या शासन निर्णयान्वये गट क संवर्गाची २० पदे भरण्यास परवानगी दिलेली असून ती विहित पध्दतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे तसेच गट ड संवर्गाची ३० पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणात जलसंधारण महामंडळाच्या अखत्यारित राबविण्यात येणारे प्रकल्प अपूर्ण असल्याबाबत

**(५८) * १६६४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यातील जलसंधारण महामंडळाच्या अखत्यारित राबविण्यात येणारे १४७ प्रकल्प अपूर्ण असल्याचे माहे डिसेबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्प अपूर्ण रहाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कोकणात सरासरीपेक्षा जास्त प्रमाणात पाऊस पडूनही पाणीटंचाई जाणवत असल्याने सदरील अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे विभागांतर्गत ७९ योजनापैकी ठाणे जिल्ह्यातील २, रायगड जिल्ह्यातील ४३, पालघर जिल्ह्यातील २ तसेच रत्नागिरी विभागांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील ४९, व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १९ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. ठाणे विभागांतर्गत १६ योजनांची कामे निविदा मंजूरीचे स्तरावर आहेत.

(२) ठाणे विभागांतर्गत ठाणे जिल्हयातील ९, रायगड जिल्हयातील ३ व पालघर जिल्हयातील २ योजनांची कामे वन जमीन प्रक्रियेमुळे सुरु करण्यात आलेली नाहीत व २ योजनांची कामे भूसंपादनाअभावी बंद आहेत.

भूसंपादन काही योजना पुनर्वसनाच्या अडचणी, काही योजनांस ग्रामस्थांचा विरोध असल्याने, काही योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असल्याने तसेच निधी अभावी योजनांची कामे विहित वेळेत पूर्ण करता आली नाहीत.

(३) अपूर्ण योजनांची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक त्या योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महागाव येथील दवाखान्यात गैरहजर रहाणाऱ्या डॉक्टरांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(५९) * २१४४ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (ता.अकोट, जि.अकोला) येथील एका पारधी कुटुंबातील महिलेला प्रसूतीसाठी टाकरखेडा मार्गावर असलेल्या एका दवाखान्यात नेले असता त्याठिकाणी डॉक्टर नसल्याने अकोटकडे जाणाऱ्या मार्गावरील एका प्रसूतीगृहामध्ये (मॅटर्निटी हॉस्पिटल) नेले असता तेथे डॉक्टर बाहेरगावी गेले असल्याने अन्य ठिकाणी सदर महिलेला नेत असताना तिची प्रसूती झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरहजर रहाणाऱ्या डॉक्टरांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) होय, तालुका आरोग्य अधिकारी तालुका अकोट यांच्यामार्फत चौकशी केली आहे. चौकशीमध्ये सदर महिलेस नातेवाईकांनी खाजगी वाहनाने खाजगी रुग्णालयामध्ये प्रसूतीकरीता दिनांक ८/०१/२०२० रोजी पहाटे ४.०० वाजता नेले परंतु सदर खाजगी दवाखाना बंद असल्याने उक्त महिलेस अन्य खाजगी रुग्णालय डॉ.सारडा आशिर्वाद हॉस्पिटल, अंजनगाव सूर्जी येथे नातेवाईक घेवून जाताना रस्त्यातच तिची नैसर्गिक प्रसूत झाली त्यानंतर सदर माता व तिच्या बाळाला डॉ.सारडा यांच्या रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे. सदर माता व बाळाची प्रकृती चांगली आहे. गैरहजर वैद्यकिय व्यावसायीक शासकीय रुग्णालयातील नसून खाजगी दवाखान्यातील व्यावसायिक आहेत. कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील मुख कर्करोग केंद्राचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(६०) * ८०८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या विद्यार्थ्यांना नविन वसतिगृहात स्थलांतरीत केल्याने जुन्या वसतिगृहाचे नुतनीकरण करुन तेथे सुपरस्पेशालिटी सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर ओरल प्री कॅन्सर सर्जरी सेंटर सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार इमारत नुतनीकरणासाठी १२ कोटी व यंत्रसामुग्रीसाठी १२ कोटी असा एकूण २४ कोटी निधीचा प्रस्ताव मागील ९ महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने शासनाने याविषयी कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

याविषयी प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील अंगणवाड्यांना इमारती बांधण्याबाबत

**(६१) * १३८३ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात ४४० अंगणवाडी केंद्रे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील भेंडा खुर्द (अंगणवाडी क्र.३८) व नेवासा खुर्द वार्ड क्र.७ (अंगणवाडी क्र.३२८) या व अन्य अंगणवाड्यांना इमारत नसल्याने गेल्या १० वर्षापासून मुलांना झाडाखाली बसवून (open space) शिकविले जात असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून लाखो रुपये खर्च होऊनही अंगणवाडी क्र.३८ व ३२८ या अंगणवाड्यांसाठी इमारती न बांधण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंगणवाडी क्र.३८ व ३२८ या अंगणवाड्यांसाठी इमारती बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) नेवासा तालुक्यात ३८६ नियमित अंगणवाडी केंद्र व ५५ मिनी अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.

नेवासा तालुक्यातील भेंडा खुर्द येथील अंगणवाडी केंद्र क्र.३८ ही मिनी अंगणवाडी व नेवासा खुर्द वार्ड क्र.७, अंगणवाडी क्र.३२८ ही नियमित अंगणवाडी असून त्या झाडाखाली भरत नसून स्थानिकांनी मोफत उपलब्ध करुन दिलेल्या जागेत ही अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत.
(३) व (४) अंगणवाडी क्र.३८ व ३२८ या अंगणवाड्यांच्या इमारती बांधण्यासाठी शासकीय किंवा इतर स्त्रोताकडून जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधित जिल्हा परिषदस्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरबाड व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील कुपोषित बालकांबाबत

**(६२) * १९७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी समाजातील बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू थांबविण्यासाठी शासनाने टास्क फोर्सची स्थापना करूनही मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात योग्य आहार न मिळाल्यामुळे १८४ बालके कुपोषित होऊन त्यांचा जीव धोक्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान महिला व बालविकास विभागाने आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयातून घेतलेल्या आढाव्यातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात मागील दीड ते दोन वर्षात विविध कारणांनी ६४ बालमृत्यूंची नोंद झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून आदिवासी बहुल असलेल्या या तालुक्यात कुपोषणाचा प्रश्न गंभीर बनला असून माहे जानेवारी, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत शहापूर बालविकास प्रकल्प कार्यालयात ३२१ कुपोषित बालकांची नोंद झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालमृत्यूंचे प्रमाण रोखण्यासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत गर्भवती मातांना सकस आहार आणि बुडीत मजुरीसाठी मातृत्व अनुदान योजनेसाठी शहापूर तालुका आरोग्य विभाग आणि बालविकास प्रकल्प दरवर्षी लाखो रुपये खर्च करत असतानाही बालमृत्यू रोखण्यात विभागाला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण करणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व शहापूर तालुक्यातील कुपोषित बालकांना योग्य आहार मिळण्याबाबत तसेच बालमृत्यू रोखण्यासाठी व वाढत्या कुपोषित बालकांची संख्या कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुरबाड तालुक्यातील १८६ मॅम बालकांमधील ७ बालके सर्वसाधारण श्रेणीत आली असून उर्वरित १७९ बालकांना ग्राम बालविकास केंद्रात दाखल केले आहे. ग्राम बालविकास केंद्रात दाखल केलेल्या बालकांना योग्य तो आहार व वैद्यकीय उपचार सुरु आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

शहापूर तालुक्यात सन २०१८-२०१९ या वर्षात ४६ व माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ अखेर २३ असे एकूण ६९ बालमृत्यू झालेले आहेत. सदर बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून न्युमोनिया, ॲस्फेक्जिया (श्वासावरोध), जन्मत: विकृती, जन्मत: कमी वजन, जंतुसंसर्ग इत्यादि कारणांमुळे झाले आहेत.

(३) हे खरे नाही.

मानव विकास योजनेंतर्गत गरोदर व स्तनदा मातांची आरोग्य तपासणी करण्यात येते. तसेच १३७३ गर्भवती मातांना बुडीत मजूरीचा लाभ देण्यात आला आहे.

शहापूर तालुक्यातील मागील तीन वर्षात बालमृत्यूच्या संख्येत घट झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर स्तनदा मातांना THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२. आदिवासी प्रकल्पांमध्ये अमृत आहार योजना सुरु असून या अंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व शाकाहारी बालकांना प्रतिदिन २ केळी व मांसाहारी बालकांना १ अंडी देण्यात येतात.

३. तसेच सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४. राज्यात पोषण अभियानांतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविधस्तरावरुन निरंतर शिक्षणवृध्दीदृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE) रिअल टाईम मॉनिटरिंग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्मार्ट अंगणवाड्या निर्माण करण्याबाबत

**(६३) * ३५७ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या सौरऊर्जेसाठी १५५ अंगणवाड्यांना स्मार्ट होण्याकरीता माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान खनिज प्रतिष्ठानच्या निधीतुन रुपये १ कोटी मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अंगणवाड्या इमारतीवर सौरपॅनल बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी यंत्र, बालकांच्या संगोपनाच्या इतर साहित्याकरीता हस्तांतरीत केले आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे अंशतः खरे आहे.

नागपूर जिल्हा परिषदेंतर्गत १५५ अंगणवाड्यांना स्मार्ट होण्याकरीता जिल्हा खनिज प्रतिष्ठानकडून रुपये २,०१,५०,०००/- मंजूर असून त्यापैकी १०% निधी जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास, जिल्हा परिषद, नागपूर यांचे कार्यालयास प्राप्त झालेला आहे.
(२) व (३) जिल्हा परिषद नागपूर यांचे कार्यालयामार्फत सौर पॅनल संच खरेदीची प्रक्रिया महाऊर्जा यांचेकडून करण्यात येत आहे. तसेच पिण्याचे पाणी यंत्र यासाठी GeM पोर्टलवर निविदा प्रकाशित करण्यात आली असून व्यापारी लिफाफा उघडण्याची कार्यवाही सुरु आहे. बालकांच्या संगोपनाच्या इतर साहित्या करीताचा निधी पंचायत समितीस्तरावर वितरीत करण्यात आला असून त्यांचेस्तरावर खरेदी प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कुणकेश्वर मंदिराचे सुशोभिकरण व सोयी-सुविधाकरीता निधी उपलब्ध करण्याबाबत

**(६४) * ७५० श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील प्राचीनकालीन कुणकेश्वर मंदिर पाहण्याकरीता विविध भागातील भक्त, पर्यटक येत असून महाशिवरात्रीचा मोठा उत्सव या मंदिरात साजरा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राचीनकालीन मंदिरात कोणत्याच मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने येणाऱ्या भक्त व पर्यटकांची अत्यंत गैरसोय होत असल्यामुळे मंदिराचे सुशोभिकरण करुन पायाभूत सोयी सुविधा पुरविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्राचीनकालीन मंदिराचे सुशोभिकरण व सोयी सुविधा यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे, तसेच मंदिराचे सुशोभिकरण करुन सोयी सुविधा पुरविल्यास तेथे पर्यटकांची संख्या वाढून शासनाच्या महसुलात देखील वाढ होईल, त्याकरीता कुणकेश्वर मंदिराचे सुशोभिकरण करुन त्याठिकाणी सर्व सोयी सुविधा पुरविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) सदर प्राचीन मंदिरास दिनांक १४/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय ब वर्ग दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच शासनाने सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयाकडुन प्रस्ताव मागविला आहे. तसेच प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी रुपये १५८.०० लक्ष इतक्या अंदाजित रक्कमेस मान्यता दिलेली असून रुपये २५.०० लक्ष ची कामे सुरू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धुमका (ता.जि.वाशिम) येथील कालव्याकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(६५) * १३९५ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ४४८१२ ला दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धुमका (ता.जि.वाशिम) लघुपाटबंधारे योजना प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्यासाठी मौजे उकळीपेन येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सन २००३-२००४ मध्ये संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूसंपादनाचा अंतिम निवाडा होऊन संबंधित कास्तकरांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत भूसंपादन अधिकारी, वाशिम यांनी उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग तसेच कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ यांना सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १४ वर्षे इतका कालावधी होऊनही संबंधित कास्तकरांना मोबदला देण्यात आला नसल्यामुळे त्यांनी जमिनीचा दुबार मोबदला, भूभाडे, व्याज व पिकांची नुकसान भरपाई ३० दिवसांत द्यावी अन्यथा दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी निवेदनाद्वारे शासनास दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सदर कालव्यावर भरावाचे ठिकाणी संसाधान व ग्राऊटेड पिचिंग बांधकामाकरीता रक्कम रुपये १४,८९,०४६/- खर्च झाल्याचे दाखविण्यात आले असून त्याचा जमिनीला लाभ झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, इतका प्रदीर्घ कालावधी होऊनही संबंधित कास्तकरांना जमिनीचा मोबदला न देण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे धुमका (ता.जि.वाशिम) लघु पाटबंधारे योजना प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्यासाठी मौजे उकळीपेन येथील शेतकऱ्यांच्या जमिनीच्या भुसंपादन प्रक्रियेसाठीचा प्रस्ताव सन २००३-२००४ मध्ये सादर करणेत आला होता.

(२) नाही.

तथापि, अंतिम निवाड्याकरीता आवश्यक असलेल्या निधीची मागणी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, वाशिम यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी वाशिम पाटबंधारे विभाग, वाशिम या कार्यालयास केली आहे. सदर प्रकल्प पूर्ण झालेला असून चालु आर्थिक वर्षामध्ये सदर प्रकल्पासाठी तरतुद मंजूर नाही. तसेच अमरावती विभाग, भुसंपादन न्यायालयीन प्रकरणी ठोक तरतुदीचा शिल्लक निधी नाही.

(३) होय.

(४) हे अंशत: खरे आहे.

धुमका ल.पा. योजना ता.जि.वाशिम उजव्या मुख्य कालव्यावर भरावाचे ठिकाणी संधानक, ग्राऊटेड पिचिंग व बांधकाम करण्याची रुपये १४,८९,०४६/- ची निविदा होती. सदर कामापोटी दिनांक ०७/०७/२००७ पर्यंत रुपये १०,६२,७२३/- अदा करण्यात आले आहेत. सदरचे काम कार्यक्षेत्रावर झालेले असल्याने ते उपयोगाचे आहे. परंतु कालव्यावरील इतर कामे शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे अपूर्ण असल्याने सिंचन होऊ शकले नाही. ही कामे पूर्ण झाल्यावर शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होईल.

(५) भूसंपादनाचा दिनांक २३/१२/२००३ च्या पत्रान्वये सदर मूळ प्रस्तावावर कार्यवाही न झाल्याने, नव्याने प्रस्ताव दिनांक ०३/०५/२०१६ च्या पत्रान्वये फेर सादर केला आहे. सदर प्रस्तावावर भुसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वीज देयकाबाबत

**(६६) * ५६२ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांना टाटा ट्रस्ट व लोकसहभागातून डिजिटल शिक्षणाच्यादृष्टीने ई-लर्निंग प्रोजेक्टर यासारखी नवनवीन तंत्र शैक्षणिक साधने पुरविण्यात येत असून सदर साधनांना लागणारी वीज व त्याची देयके भरण्याबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीज देयके ग्रामपंचायतीने भरावी याकरीता जिल्हा परिषद शिक्षण सभापती यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्हा परिषदेच्या शाळांची विजेची देयके भरण्याबाबत लागणारा निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) समग्र शिक्षांतर्गत संयुक्त शाळा अनुदानातून वीज देयके अदा केली जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात बालमृत्यूचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(६७) * १८२० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या दोन वर्षात जंतुसंसर्ग, गुदमरणे, फुफ्फुसाचा आजार, जुलाब, ताप, गोवर आदी कारणांमुळे ० ते १ वर्ष वयोगटातील ७१९ आणि ० ते ५ वर्षे वयोगटातील १६९ असे एकूण ८८८ बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात मातांचे व बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात असतानाही बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करुन बीड जिल्ह्यातील बालमृत्यू रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१७-२०१८ च्या तुलनेत सन २०१८-२०१९ मध्ये बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे (अनुक्रमे ४५२ वरुन ४३६).

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बालमृत्यू रोखण्यासाठी पुढील उपाययोजना केली जाते.

१) घरच्या घरी नवजात बालकांची काळजी (Home Based New Born Care), आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी आरोग्य संस्थांमध्ये विशेष कक्ष (Special New Born Care Unit-(SNCU), नवजात शिशु कोपरा (New Born Care Corners-(NBCC), बाल उपचार केंद्र (Child Treatment Centres-CTC) स्थापन केले आहे.

२) जिल्हा रुग्णालय बीड येथे एसएनसीयु कार्यरत असून अतिगंभीर आजारी बालकांना दाखल करुन उपचार करण्यात येते.

३) स्त्री रुग्णालय नेकनुर, उपजिल्हा रुग्णालय गेवराई, केज व परळी वैजनाथ, ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे एनबीएसयु कार्यरत असून या ठिकाणी नवजात बालकाचे स्थिरीकरण करण्यात येते.

४) सर्व आरोग्य संस्थामध्ये प्रसूतीगृहात एन.बी.सी.सी. कॉर्नर स्थापन करण्यात आले आहेत.

५) आशाद्वारे नवजात बालकांना घरोघरी जावून भेटी देऊन आजारी बालकांवर औषध उपचार केले जातात.

६) नियमित लसीकरण केले जाते व पोषण आहारबाबत माहिती देण्यात येते.

७) अतिसारामुळे होणारे बालमृत्यू टाळण्यासाठी आय.डी.सी.एफ. मोहिम राबविण्यात येते.

८) जे.एस.एस.के. अतंर्गत एक वर्षापर्यंतच्या आजारी बालकांना मोफत रुग्णवाहिका सेवा तसेच औषधे व उपचार केला जातो.

९) आर.बी.एस.के. अंतर्गत अंगणवाडीतील बालकांची तपासणी करून कुपोषित बालके एन.आर.सी.मध्ये संदर्भीत करण्यात येतात.

१०) संस्थात्मक प्रसूती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना इ.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात कामगार रुग्णालय उभारण्याबाबत

**(६८) * १२९४ श्री.प्रसाद लाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विविध कारखाने, उद्योग आदींमधून काम करणाऱ्या कामगारांच्या पगारातून दरमहा नियमितपणे वसुल करण्यात येणाऱ्या ई.एस.आय.सी.च्या हप्त्यामार्फत दर महिन्याला कोट्यवधी रुपयाचा निधी शासनाच्या तिजोरीत जमा होत असतानाही रुग्णांना उपचारासाठी ठाणे, मुंबई येथे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील काही खाजगी रूग्णालयामध्ये उपचाराची सोय करण्यात आलेली असून अत्यावश्यक साधनसामुग्रीचा अभाव असल्याने रुग्णांना उपचारापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी जिल्हा म्हणून पालघरची ओळख असली तरी तेथे मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहतींचे जाळे पसरलेले असल्याने हजारो कारखान्यात व उद्योगधंद्यात कोट्यवधी कामगार कार्यरत असल्याने कामगारांसाठी आवश्यक असणारे ई.एस.आय.सी.चे रुग्णालय तारापूरमध्ये सुरु करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तारापूर एमआयडीसीमध्ये सुरु असलेल्या अपघाताच्या घटनांमुळे पालघर जिल्ह्यात ई.एस.आय.सी. रुग्णालयाची आवश्यकता असतानाही कामगार रुग्णालय उभारण्यास दिरंगाई होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यात कामगार रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

राज्य कामगार विमा महामंडळाने खाजगी रुग्णालयांशी टाय-अप केलेल्या प्राथमिक आरोग्य सेवाकरीता ३२, व्दितीय आरोग्य सेवाकरीता ६ आणि अतिविशिष्ट विशेषज्ञ उपचार सेवाकरीता एका रुग्णालयांमार्फत वैद्यकीय उपचार पुरविल्या जातात.

(२) हे खरे नाही.

टाय-अप करण्यापुर्वी खाजगी रुग्णालयांची तपासणी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून केली जाते.

(३) हे खरे नाही.

तथापि, दवाखाना तथा शाखा कार्यालय सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याचे राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(६९) * २१६५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावर भरती प्रक्रिया सुरु असताना सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया सुरु नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) शासनाने दिनांक ६ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये अनुकंपा नियुक्ती करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना दिल्या असून त्यानंतर दिनांक ५ फेब्रुवारी, २०२० च्या पत्रान्वये १०% ऐवजी २०% या प्रमाणात अनुकंपा नियुक्ती करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सोलापूर जिल्हा परिषदेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे दुबळवेळ ते गुंज रस्त्याचे (ता.मालेगाव, जि.वाशिम) काम सुरू करण्याबाबत

**(७०) * १९९० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दुबळवेळ ते गुंज (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ग्रामीण मार्ग ७१ रस्ता मंजूर करुन त्यांची निविदा काढुन २ वर्षे उलटूनही सदर रस्त्याचे काम सुरू करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे दुबळवेळ ते गुंज रस्त्याचे काम विनाविलंब सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर रस्त्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ०२/०७/२०१८ रोजी देण्यात आला आहे. तथापि, दिनांक २३/०७/२०१८ ते दिनांक २१/१२/२०१८ या कालावधीतील मा.उच्च न्यायालयाचा स्थगनादेश व सदर रस्त्याच्या वन जमिनीतून जाणाऱ्या लांबीबाबत वन विभागाकडे परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असून वन विभागाची परवानगी अद्याप अप्राप्त आहे. तसेच उर्वरीत लांबीत स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध दर्शविल्याने सदर रस्त्याचे काम सुरू करता आले नाही.

-----------------

## चंद्रपूर व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी “चांदा ते बांदा” ही नाविन्यपूर्ण योजना राबविण्याबाबत

**(७१) * १४०७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर व सिंधुदुर्ग जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध संसाधनाचा नियोजनबध्द वापर करण्यासोबतच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दरडोई आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने राज्यात "चांदा ते बांदा" ही नाविन्यपूर्ण योजना सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर उक्त दोन जिल्हयांसाठी राबविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत शासनाने शंभर कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली असून सदर योजनेतील विविध उद्योगांसाठी शेतकऱ्यांनी प्रकल्प अहवाल तयार करुन २० टक्के रक्कम जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु योजनेव्दारे सिंधुदुर्ग जिल्हयासाठी सन २०१६-२०१७, २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या कालावधीत प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला व किती लाभार्थ्यांनी या योजनेचा प्रत्यक्षात लाभ घेतला आहे,
(४) तसेच, निधी उपलब्ध असतानाही कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयात या योजनेंतर्गत एकही योजना न राबविण्याची कारणे काय असून उक्त योजनेची मुदत माहे मार्च, २०२० पर्यंतच असल्याचे नियोजन विभागाने कळविले असल्याने निधी अखर्चित राहिल्यामुळे शासनाला समर्पित करावा लागत असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ही महत्वाकांक्षी योजना बंद केल्याने यात गुंतवणूक केलेल्या शेतकऱ्यांचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त महत्वाकांक्षी योजना अविरतपणे सुरु राहण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

नियोजन विभागामार्फत सिंधुदुर्ग व चंद्रपूर या जिल्हयात प्रथमत: सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या ४ वर्षाच्या कालावधीसाठी "रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट हा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यासाठी चांदा ते बांदा योजना" राबविण्यात येत आहे.

(२) सिंधुदुर्ग व चंद्रपूर या दोन्ही जिल्ह्याकरीता प्रत्येकी १०० कोटी प्रमाणे तरतूद केली होती, हे खरे आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये या योजनेत शासन अनुदान व लाभार्थी हिश्श्याचे प्रमाण प्रवर्गानुसार "अनुसूचित जाती"(SC) व "अनुसूचित जमाती" (ST) गटासाठी ९०:१० आणि सर्वसाधारण गटाकरीता ७५:२५ या प्रमाणात राज्यस्तरीय समितीकडून ठेवण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये लाभार्थी हिस्सा पूर्ण जमा झालेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये लाभार्थी हिस्सा पूर्ण जमा झालेला नाही.

(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी सन २०१६-२०१७ मध्ये रुपये ४९.०० कोटी, सन २०१७-२०१८ मध्ये ६७.०० कोटी, सन २०१८-२०१९ मध्ये ७२.५७ कोटी इतका निधी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना वितरीत करण्यात आला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात "कृषी व मत्स्यव्यवसाय" या क्षेत्रांत राबविण्यात आलेल्या योजनेंतर्गत एकूण ३४५८ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

(४) हे खरे नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यात विविध योजनेंतर्गत ३४५८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. चांदा ते बांदा योजना सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या ४ वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. या योजनेची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत असल्याने नियोजन विभागाकडून "चांदा ते बांदा" योजनेंतर्गत ४ वर्षात करण्यात आलेल्या कामाची सद्य:स्थिती व झालेला खर्च याचा सविस्तर आढावा होण्याकरीता आवश्यक असणारी माहिती मागविण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदुर्ग यांना दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी "कोणत्याही नवीन कामांना/योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात येऊ नये, तसेच ज्या कामांना/योजनांना यापूर्वी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे अशा कामांना/योजनांना कार्यारंभ आदेश देण्यात येऊ नयेत" अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, अखर्चित निधी शासनाला समर्पित करण्याबाबत जिल्हाधिकारी चंद्रपूर व सिंधुदुर्ग यांना कोणत्याही सूचना देण्यांत आलेल्या नाहीत.

(५) हे खरे नाही.

(६) नियोजन विभागामार्फत सिंधुदुर्ग व चंद्रपूर या जिल्ह्यात प्रथमत: सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या ४ वर्षाच्या कालावधीसाठी "रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट हा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यासाठी चांदा ते बांदा योजना" राबविण्यात येत आहे. सविस्तर आढाव्या नंतर या संदर्भात उचित निर्णय घेण्यात येतील.

-----------------

## कोकणातील कातळशिल्पांना "संरक्षित स्मारक" घोषित करण्याबाबत

**(७२) * २१४९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रत्नागिरी, लांजा आणि राजापूर या तीन तालुक्यातील ५७ गावांमध्ये सुमारे १२०० कातळशिल्पांची राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने स्थानिकांच्या मदतीने सविस्तर नोंद केली असून यापैकी १० ठिकाणांना "संरक्षित स्मारक" म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोव्यातील कातळशिल्पांना तेथील राज्य पुरातत्व विभागाने संरक्षित स्मारकांमध्ये नोंद केली असून त्याच धर्तीवर कोकणातील कातळशिल्पांबाबत राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने "संरक्षित स्मारक" म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव सन २०१७ मध्ये सादर करण्यात आलेला असतानाही, जगातील वारसा स्थळांमध्ये समाविष्ट होऊ शकण्याची क्षमता असणाऱ्या उपरोक्त कातळशिल्पांचा "संरक्षित स्मारक" म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने शासनाला सादर केलेल्या उक्त ठिकाणांना "संरक्षित स्मारक" म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, राज्याच्या पर्यटन विभागाने या स्मारकाच्या संवर्धन कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली, असून उक्त ठिकाणांना "संरक्षित स्मारक" घोषित केले नसल्याने निधी देण्यास असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू कातळ शिल्पाच्या ठिकाणांना "संरक्षित स्मारक" घोषित करण्याच्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोकणातील प्रागैतिहासीक काळाबाबत अधिक संशोधन करण्याच्या दृष्टीने सन २०१६-२०१७ मध्ये रत्नागिरी जिल्हयात गवेषणाचे काम हाती घेण्यात आले होते. त्यात राजापूर, लांजा व रत्नागिरी तालुक्यात मिळून ५२ कातळशिल्पांसंबधी पुरास्थळे सापडली आहेत. त्यापैकी १० कातळशिल्पांना राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याचे प्रस्ताव पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाकडून सादर करण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) होय.

गोव्यातील कातळशिल्पांना तेथील राज्य पुरातत्व विभागाने संरक्षित स्मारकांमध्ये नोंद केली असून त्याच धर्तीवर कोकणातील कातळशिल्पांबाबत राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाने "संरक्षित स्मारक" म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर पुरास्थळे संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्यास तेथील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यास पर्यटन विभागाने अनुकूलता दर्शविली आहे. मात्र सदर कातळशिल्पे ही बहुतांश खाजगी मालकीच्या जमिनीमध्ये स्थित आहे. या जमिनीच्या मालकी हक्कात अनेक सहधारकांची नावे आहेत. अशा सर्व सहधारकाची सहमती मिळविण्याचा प्रयत्न विभागाकडून सुरू आहे.

-----------------

## राज्यातील आरोग्य सेवा संचालनालयातील कंत्राटी डॉक्टरांना मानधन मिळण्याबाबत

**(७३) * १३७८ श्री.विलास पोतनीस, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागातील १३०० डॉक्टर गत सहा महिन्यांपासून वेतनाच्या प्रतिक्षेत असल्याने ५० टक्के डॉक्टरांनी पदांचे राजीनामे दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील जनतेला उपचार मिळण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाने कंत्राटी पध्दतीने डॉक्टरांच्या नियुक्त्या केला आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टरांना वेतन देण्यासाठी आरोग्य विभागाकडे निधी नसल्याने गडचिरोली, नंदुरबार, रत्नागिरीसह राज्याच्या दुर्गम भागात काम करणाऱ्या आरोग्य विभागाच्या डॉक्टरांना वेळेवर वेतन मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील आरोग्य विभागातील अल्प वेतनावर काम करणाऱ्या डॉक्टरांना मागील थकीत मानधन तसेच वेळेवर वेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, क्र.मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१(भाग-१)/सेवा-३, दिनांक ०३/१२/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ११ महिन्यांसाठी कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

१०-कंत्राटी सेवा या बाबीअंतर्गत पुरवणी मागणी मंजूर होईपर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शिल्लक निधीतून कंत्राटी वैदयकीय अधिकाऱ्यांना संचालनालयस्तरावर मानधन देण्यात आले आहे. सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनात एकूण रुपये ५६ कोटींची पुरवणी मागणी मंजूर झाली असून त्यानुसार दिनांक ३१/०१/२०२० रोजी सर्व उपसंचालकांना कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना मानधन अदा करण्यासाठी निधी वितरीत केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड ते रायगड किल्ल्यापर्यंतच्या रस्त्याच्या कामामध्ये त्रुटी असल्याबाबत

**(७४) * १५६३ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड किल्ले संवर्धनासाठी शासनाने रुपये ६०६ कोटी खर्चाचा आराखडा मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर आराखड्याच्या रुपये ६०६ कोटी निधीपैकी रुपये १२५ कोटी रायगड किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी तसेच महाड ते रायगड किल्ल्यापर्यंतच्या रस्त्याच्या कामासाठी रुपये १४७ कोटी मंजूर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाड ते रायगड किल्ल्यापर्यंतच्या रस्त्याच्या कामासाठी दोन वर्षापूर्वी ठेकेदाराला साधनसामुग्रीसाठी पहिल्या टप्प्यात रुपये ७.५ कोटी तर दुसऱ्या टप्प्यात रुपये ८.५ कोटी देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठेकेदाराने केलेल्या कामामध्ये अनेक त्रुटी असल्याने याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदारांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

पर्यटन उपविभागाच्या दिनांक ३१/०३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये भारतीय पुरातत्व विभागाच्या पर्यवेक्षणाखाली किल्ल्याशी संबंधित कामासाठी रुपये १२४.१४ कोटी इतका निधी मजुर आहे. केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. NH-१६६F-MAH-२०१७-१८-१२४४, दिनांक २८ मार्च, २०१८ अन्वये महाड जंक्शन ते रायगड किल्ला ते चित्त दरवाजा-पाचाड ते जिजामाता स्मारक व हिरकणी जोडरस्ता रा.म. १६६ फ (रस्त्याची लांबी २५.६०९ कि.मी.) या रस्त्याच्या २/४ पदरीकरण व उन्नतीकरण करणेच्या कामास रुपये २३७.४० कोटी इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आलेली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याच्या करारनाम्यातील शर्थ क्र. १९/०२/१ अनुसार मे.पाटील कंस्ट्रक्शन इन्फ्रास्ट्रक्चर लि. व एम.बी.पाटील कंस्ट्रक्शन पुणे यांच्या मागणीनुसार त्यांना रुपये ७,३३,६०,०००/- इतकी रक्कम सदर Mobilization Advance म्हणून देण्यात आलेली आहे. सदर ठेकेदारास दुसऱ्या टप्प्यात कोणतीही रक्कम देण्यात आलेली नाही.

(४) हे खरे आहे.

(५) ठेकेदाराचे कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कामाची प्रगती दिसत नव्हती. या विषयी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्रालय (MoRT& H) यांनी वेळोवेळी दिल्ली तसेच मुंबई येथे बैठका घेतल्या व सदर कामाची प्रगती नसल्याने सदरचा प्रकल्प रखडलेले प्रकल्प (Stuck up Project) अंतर्गत समाविष्ट करण्यात आला. दिनांक १३/१२/२०१९ रोजी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्रालय (MoRT& H), नवी दिल्ली येथे झालेल्या रखडलेल्या प्रकल्पाच्या (Stuck up Project) बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे सदर कामासाठी मार्च, २०२० पर्यंत जादा कालावधी देण्याचे मान्य करण्यात आले. जेणेकरुन फेर

निविदेमध्ये जो कालावधी जाईल तो वाचवता येईल व कामाचा खर्चही वाढणार नाही. सदर कामासाठी जून, २०२० पर्यंत संपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण करणे आणि पुढील ३ ते ६ महिन्यात सर्व संरचनांचे (Structure) बांधकाम पूर्ण करणे असे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत सदर ठेकेदारावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे (ता.वसई, जि.पालघर) या प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७५) * २१५३ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे (ता.वसई, जि.पालघर) जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या ५० वर्षापूर्वी बांधलेल्या चार प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती जीर्ण होऊन मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चारही प्राथमिक आरोग्य केंद्रात बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, भुलतज्ज्ञ आणि इतर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी त्याचप्रमाणे (सोनोग्राफी मशीन, एक्सरे मशीन, डायलेसीस केंद्र) इत्यादी सोई-सुविधांचा अभाव आणि औषधांचा तुटवडा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शासनाच्या निकषाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ ही पदे मंजूर नाहीत. तसेच सोनोग्राफी मशीन, एक्सरे मशीन, डायलसीस केंद्र ह्या सुविधा उपलब्ध नसतात. बिगर आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी गट-अ २ पदे मंजूर आहेत व आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी गट-अ चे १ पद व वैद्यकिय अधिकारी गट-ब चे १ पद अशी २ पदे मंजूर आहे.

(३) सद्य:स्थितीत निवेदन आढळून येत नसून निवेदनाचा शोध सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून सदर चारही प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत शासनाच्या निकषाप्रमाणे अपेक्षित आरोग्य विषयक सुविधा जनतेस पुरविण्यात येतात.

-----------------

## परभणी शहरासह जिल्ह्यात डेंग्यू व इतर साथीच्या आजारांची लागण झाल्याबाबत

**(७६) * ६७५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी डेंग्यू सदृश्य व इतर साथीच्या आजारांची लागण झाल्याचे सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती, आरोग्य विभाग आदिंनी केलेल्या दिरंगाईमुळे साथीच्या रोगात वाढ झाल्याबाबतची तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे लेखी तक्रारीव्दारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी व यंत्रणेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय.
(२) नाही.

विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार संबंधित कार्यालयाकडे असे निवेदन /तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) आजाराच्या नियंत्रणासाठी जलद ताप सर्वेक्षण, किटकशास्त्रीय सर्वेक्षण रक्त नमुणे व रक्तजल नमुना घेणे, धुर फवारणी, अळीनाशक फवारणी, वाढीव धुर फवारणी, गप्पी मासे सोडणे, एम.एल.ओ. ऑईल यासारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहे. तसेच शाळा, कॉलेज, गाव पातळीवर किटकजन्य रोग प्रादूर्भाव व उपाययोजनांसाठी आठवड्यातील एक दिवस कोरडा पाळण्यात यावा यासाठी जनजागृती करण्यात आली आहे. तसेच शासकीय रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पुरेसे मुनष्यबळ व औषध साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे रोगप्रादूर्भाव आटोक्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे निंब (कपिलेश्वर) (जि.जळगाव) येथील कपिलेश्वर मंदिरासाठी पूरसंरक्षण भिंत बांधण्याबाबत

**(७७) * ९०५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे निंब (कपिलेश्वर) (ता.अमळनेर, जि.जळगाव) येथील पांझरा व तापी नदीच्या संगमावरील कपिलेश्वर मंदिरासाठी पूरसंरक्षण भिंत बांधकामाला दिनांक ११ सप्टेबर, २०१९ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही निधी अभावी सदर काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विकास कामांसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.
(२) व (३) सदरहू कामास निधी मिळण्यासाठी लाक्षणिक पुरवणी मागणी प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर केला आहे.

-----------------

## राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(७८) * १६६५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १० मोठे, १८ मध्यम आणि २४ लघु असे ५२ जलसिंचन प्रकल्पांसाठी नाबार्ड बँकेकडून १५ हजार कोटींचे कर्ज काढण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यासाठी रुपये ३३८०/-, विदर्भासाठी रुपये ३८४७/- तर उर्वरित महाराष्ट्रासाठी रुपये ७७७९/- कोटी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाबार्ड बँकेकडून देण्यात आलेल्या कर्जाच्या अनुषंगाने ५२ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याच्यादृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशिल काय आहे,
(४) सदर प्रकल्पांना निधी देण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) नाही.

प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) व बळीराजा जलसंजीवनी योजना (BJSY) या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून राज्यातील उर्वरित बांधकामाधीन प्रकल्पांपैकी जे प्रकल्प प्रगत अवस्थेत आहेत व ते प्रकल्प तातडीने पूर्ण करून पुढील तीन वर्षामध्ये सिंचनाचा लाभ प्राप्त होवू शकेल, असे पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये १५ हजार कोटीचे दीर्घ मुदतीचे कर्ज वित्तीय संस्थाकडून उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुषंगाने दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या ऑनलाईन बदलीबाबत

**(७९) * २१४७ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांमध्ये अनियमितता झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०४ शिक्षकांनी ठाणे सिव्हील, टाटा, जे.जे., केईएम रुग्णालयाचे वैद्यकीय दाखले जोडून बदल्या करुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) शिक्षण समितीच्या सभेत सन्माननीय सदस्य यांनी चर्चेअंतर्गत मुद्दा उपस्थित केला की, जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेत संवर्ग-१ अंतर्गत ज्या शिक्षकांनी लाभ घेतला आहे त्यांनी सादर केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र ज्या प्राधिकरणाकडून घेऊन सादर केले आहे त्या सक्षम प्राधिकरणाकडे पडताळणीसाठी पाठवावे व सदर वैद्यकीय प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पहावी. त्यानुषंगाने एकूण १५३ शिक्षकांनी सादर केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र हे संबंधित प्राधिकरणाकडे पडताळणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत.

(३) विशेष संवर्ग भाग-१ मध्ये लाभ घेतलेल्या शिक्षकांचे वैद्यकीय प्रमाणपत्र पडताळणीसाठी दिनांक २३/१२/२०१९ रोजी सादर करण्यात आले आहे. त्यासंबंधिचा अहवाल प्राप्त होताच दिनांक २८/०६/२०१८ च्या शासन परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या तरतुदीप्रमाणे नियमोचित कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** | **श्री.राजेंद्र भागवत**
**मुंबई.** | **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.